**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# आस्वाद

दिवाळीच्या व येणा-या नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

'अर्थबोधपत्रिके'चा हा अंक आपल्या हाती पडेल तेव्हा दिवाळी नुकतीच सरलेली असेल. (महागाई असली तरी) सणासुदीनिमित्ताने थोडीफार खरेदी झाली असेल. दिवाळीच्या रुचकर फराळाची चव जिभेवर रेंगाळत असेल. याचबरोबर दिवाळीनिमित्त विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांचा आस्वादही घेऊन झाला असेल. आपल्या सर्वांचा दिवाळीचा हा आनंद द्विगुणित करण्यासाठी 'अर्थबोधपत्रिके'चा हा दिवाळी अंक आपल्यासमोर आला आहे तो साहित्यिक फराळ घेऊन. नोबेल पुरस्काराची सुरुवात झाल्यापासून (१९०१) ते आजपर्यंत (२०१०) साहित्याचे नोबेल पुरस्कार मिळविलेल्या लेखिकांची आणि त्यांच्या साहित्याची अल्पशी ओळख या अंकात करून घेण्यात आली आहे.

मानवाच्या उत्क्रांतीच्या काळात शब्दांची व भाषेची निर्मिती केव्हा व कशी झाली हा खचितच संशोधनाचा विषय आहे. टोळ्यांत राहणा-या मानवाचे रूपांतर समूहात आणि समूहाचे रूपांतर समाजात होण्याच्या या काळात भाषेचा विकास झाला असावा. भाषेमुळेच समाजात राहणा-या माणसांचा परस्परसंवाद घडू लागला, विविध प्रकारची देवाणघेवाण होऊ लागली. भाषा ही साहित्याची जननी आहे. भाषेचा, माणसांचा आणि समाजांचा विकास टप्प्याटप्प्याने पुढे सरकत असतानाच्या काळात साहित्याची निर्मिती झाली असावी. साहित्यातून मानवी भावनांचा आविष्कार होत असतो. केवळ मनोरंजन किंवा ज्ञान एवढ्यापुरतीच साहित्याची कक्षा मर्यादित नाही. तर, साहित्य हे बहुविध, बहुरंगी व बहुढंगी रुपात आपल्यासमोर येत असते. कथा, कविता, निबंध, नाटक इत्यादी साहित्यप्रकार यामुळेच साकारतात. केवळ कलेसाठी कला हाच साहित्याच उद्देश नसून साहित्य हे संस्कृतीचेच एक अंग आहे. संस्कृतीचा परिणाम साहित्यावर होत असलेला दिसून येतो. साहित्याच्या काळानुरूप होणा-या विकासाबरोबर संस्कृतीही विकसित होत जाते.



साहित्य हा माणसामाणसांना जोडणारा एक समर्थ दुवा आहे, समाजमनाला जोडणारा एक मोठा सांधा आहे. साहित्य हा समाजमनाचा आरसा आहे. साहित्यातून व्यक्तीचे, व्यक्ती राहात असलेल्या समाजाचे आणि राष्ट्राचे दर्शन होत असते. जगणे हाच ध्यास असलेल्या माणसांचे जगणे हे साहित्यनिर्मिती झाल्याने अधिक अर्थपूर्ण बनते. जगण्याचे संदर्भ स्थलकालानुसार बदलत असतात. कालप्रवाहात अनेक खुणा पुसल्या जातात. परंतु, साहित्य ही अशी गोष्ट आहे की ती इतिहास, भूगोल यांना आपल्या कवेत घेतेच. शिवाय, विज्ञानाशीही मैत्री करते. तसेच अन्य शाखांच्या आधाराने भूतकाळातील व वर्तमानकाळातील खुणा जपून ठेवत असते, भविष्याचा वेध घेऊन त्याच्याही खुणा शोधत असते. विज्ञानाने आपले जीवन सहज, सुखकर होते, पण साहित्याने जगणे समृद्ध होते. जीवनाच्या कक्षा साहित्याने व्यापक बनत जातात, रुंदावत जातात. समाजात होणा-या सततच्या परिवर्तनात साहित्य सतत कात टाकत नवीन रूप धारण करत असते. समाजाच्या त्या त्या काळातील माणसांची मानसिकता, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विचारप्रवाह व समाजातील विविध बाबींसंदर्भातील वस्तुस्थिती आणि कलाविषयक नानाविध संकल्पना या सर्वांचा विचार साहित्यातून होत असतो. समाजमनाच्या जडणघडणीत साहित्याला, वाङ्मयाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारताच्या स्वातंत्र्य-लढ्याच्या वेळी बंकिमचंद्र यांच्या 'वंदे मातरम्' या गीताने भारतीय समाजमन घडविण्यात मोलाची भूमिका बजावली. ***(पृष्ठ ४० वर पाहावे)***

**निवेदन**

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# रंजनातून ज्ञान, ज्ञानातून प्रबोधन



सेल्मा लागरलोफ्(१८५८-१९४०)

बालपणीचे संस्कार, त्या कोवळ्या वयात मनावर उमटलेले ठसे अमिट असतात. त्या संस्कारांच्या मुशीतून घडलेले बालपणीचे अंतर्विश्व मोठेपणीच्या जीवनव्यवहारांतून प्रगटत असते. साहित्याच्या क्षेत्रातील स्पृहणीय कामगिरीबद्दल नोबेल पुरस्काराचा मान मिळवणारी पहिली स्त्री साहित्यिक आणि नोबेल पुरस्काराने गौरविली गेलेली पहिली स्वीडिश नागरिक असा दुहेरी लौकिक संपादन केलेल्या सेल्मा लागरलोफ् (Selma Lagerlof) यांनी स्वतःचे शैशव साहित्याच्या माध्यमातून प्रौढपणीही जपले ते त्रिखंडात कीर्ती लाभलेल्या अजरामर बालसाहित्याची निर्मिती करून. बहुढंगी लेखनकृतींद्वारा साहित्याच्या जागतिक विश्वात स्वतःची नाममुद्रा कोरणा-या सेल्मा यांची, ‘कल्पनारम्य आणि रंजक कथांचे लेखन आणि कथन करणारी साहित्यकार’, अशीच प्रतिमा जन्मभर राहिली. परीकथा, राहत्या परिसरातील जहागीरदार-मनसबदारांच्या पूर्वकथा, सरदार-उमरावांच्या विलासी जीवनशैलीच्या बालपणी ऐकलेल्या कथा-गाथांद्वारे सेल्मा यांच्या मनोभूमीत रुजलेले रंजकतेचे बीज पुढे आयुष्यभराच्या त्यांच्या अक्षरनिर्मितीद्वारे बहरून आले. हे बीजारोपणही मोठ्या विलक्षण परिस्थितीमध्ये घडून आले. २० नोव्हेंबर १८५८ रोजी सेल्मा यांनी या जगात पहिला श्वास घेतला तो खुब्याला झालेल्या जन्मजात दुखापतीसहच. पुढे काही काळानंतरच आलेल्या एका आजारपणामुळे त्यांच्या दोन्ही पायांना अधुपण आले. निवृत्त लष्करी अधिकारी असलेले वडील आणि आजी या दोघांनीही सेल्मा यांच्या शिक्षणाची घरीच सोय केली. त्या वेळी ऐकलेल्या रम्यकथांचा चिरपरिणाम सेल्मा यांच्या सुप्त सर्जनशीलतेवर झाला असावा. वाचनाचे अतीव प्रेम सेल्मा यांना जडले ते तेव्हाच.



सेल्मा यांनी नोकरी पत्करली तीही स्थानिक शाळेतील शिक्षिकेची. वर्गातील मुलांना गोष्टी सांगण्याच्या निमित्ताने त्यांच्या ठायीच्या कथनगुणांचेही संगोपन त्याच काळात घडले. स्वीडनच्या भूमीतील लोककथा, आख्यायिका, परीकथा हाच त्यांच्या कथाकथनाचा मुख्य गाभा असे. आपल्या लहानपणी ऐकलेल्या कथा-गाथाच त्या मुलांना विलक्षण रंगवून सांगत. सेल्मा यांच्या ठायीचे लेखनगुणही याचदरम्यान अंकुरत होते. शाळेतील शिकविणे सुरू असतानाच आपल्या पहिल्या कादंबरीची जुळवाजुळव सेल्मा करीत होत्या. लिहून तयार झालेली कादंबरीची सुरुवातीची काही प्रकरणे सेल्मा यांनी साहित्यविषयक एका स्पर्धेमध्ये सादर केली. रसिकांकडून होणा-या लेखनस्वीकृतीची पहिलीवहिली चुणूक सेल्मा यांना तिथेच मिळाली. त्या स्पर्धेत त्यांच्या त्या अर्ध्यामुर्ध्या लेखनाला पारितोषिक मिळाले एवढेच केवळ नाही तर, तयार होऊ घातलेल्या संपूर्ण पुस्तकाच्या प्रकाशनाचा करारही तिथे साकारला. १० वर्षांच्या नोकरीनंतर, १८९५ साली सेल्मा यांनी सेवेचा राजीनामा दिला आणि संपूर्ण वेळ लेखनालाच वाहून घेण्याचा संकल्पही सोडला. स्वीडिश अकादमीने पुरविलेल्या अर्थसाहाय्यामुळे आपला संकल्प व्यवहारात उतरविणे सेल्मा यांना शक्यही झाले.

तो सारा काळ होता १९ व्या शतकाच्या अखेरच्या पर्वाचा. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील कादंबरी लेखनावर प्रगाढ प्रभाव होता तो वास्तववादी लेखनशैलीच्या चळवळीचा. लेखनालाच जीवितध्येय मानण्याचे उदक सोडलेल्या सेल्मा यांनी मात्र वेगळा लेखनपंथ स्वीकारला. हा मार्ग होता वास्तववादी लेखनशैलीच्या बरोबर विरुद्ध दिशेने जाणारा - रोमँटिसिझमचा, कल्पनारम्यतेचा. कल्पनारम्यता हा सेल्मा यांच्या पुढील सा-या लेखनाचा जणू स्थायीभावच बनला. मग लेखनाचा तो आकृतिबंध कादंबरीचा असो वा लघुकथेचा. उत्तर स्वीडनमधील निसर्ग आणि तिथल्या शेतकरी जीवनाचे चित्रण हा त्यांच्या साहित्यकृतींचा एक मुख्य विषय बनून राहिला. वास्तव आणि काल्पनिकता यांची सरमिसळ, रोजचे व्यवहारी जग आणि स्वप्नभूमीतील जग यांच्या परस्परांत विरघळून जाणा-या सीमा हे सेल्मा यांच्या एकंदरच लेखनकृतींचे अंगभूत वैशिष्ट्य ठरले. त्यांच्या लघुकथांमधील पात्रेही वास्तव आणि स्वप्नांच्या गळाभेटीतच वावरताना दिसत.

साहित्याच्या प्रांतातील मुळाक्षरे गिरविण्याचा प्रारंभ कादंबरी लेखनापासून करणा-या सेल्मा यांचा अक्षरवाङ्.मयाच्या विश्वात ठसा उमटला तो मात्र त्यांच्या खास मुलांसाठी लिहिलेल्या The Wonderful Adventures of Nils या द्विखंडात्मक ग्रंथाने. विख्यात ब्रिटिश साहित्यिक आणि कवी रुडियर्ड किपलिंग यांच्या प्राणिकथांची प्रेरणा सेल्मा यांच्या या लेखनामागे काही प्रमाणात असली तरी, मुळात शाळेतील मुलांना स्वीडनचा भूगोल रंजकपणे शिकविण्यासाठी अध्यापन साहित्य निर्माण करण्याच्या हेतूने तिथल्या प्राथमिक शिक्षण मंडळाने प्रवर्तित केलेल्या प्रकल्पातून ही अजोड साहित्यकृती साकारली.

एका गरीब शेतक-याचा नील्स नावाचा १४ वर्षांचा खट्याळ, खुशालचेंडू, बराचसा आत्मकेंद्री असा मुलगा हा या कथाविश्वाचा नायक. स्वार्थीपणाच्या सीमारेषेवर रेंगाळणा-या त्याच्या आत्मकेंद्रीपणाला विटून एक वामनमूर्ती राक्षस नील्सचे रूपांतर एका ठेंगू मुलात करून टाकतो. मुळातच अफाट धडपड्या असणारा नील्स शेतावरीलच एका हंसावर स्वार होऊन पर्यटनाला निघतो. या दोघांना साथ मिळते वनहंसांच्या एका थव्याची. या देशप्रदक्षिणेदरम्यान सहका-यांच्या वर्तनाद्वारे निःस्वार्थीपणाचे संस्कार नील्सच्या मनावर घडतात आणि त्याच्या व्यक्तित्वात आमूलाग्र परिवर्तन घडून येते, हा या सा-या कथावस्तूचा गाभा.

स्वीडनचा इतिहास, भूगोल, पुराणकथांमधून डोकवणारा भूतकाळ यांच्याच जोडीने स्वीडिश जीवनपद्धतीचाही परिचय या ललितकृतीद्वारे सेल्मा घडवितात. शालेय वयातील वाचकांनाच केवळ नाही तर, कार्ल पॉपर यांच्यासारख्या विश्वविख्यात तत्त्वज्ञान्यालाही सेल्मा यांच्या या लेखनाविष्काराने मोहित केले. The Wonderful Adventures of Nils हे पुस्तक आणि त्याच्या जोडीनेच सेल्मा यांच्या बहुतेक सर्वच साहित्याचे आपण अनेकदा वाचन केले, असे स्वतः पॉपर यांनीच नमूद केले आहे. तर, याच पुस्तकाची अनेकवार पारायणे केल्याने स्वीडनला प्रत्यक्ष भेट देण्यापूर्वीच तो देश जणू माझ्या ओळखीचा झालेला होता, असे उद्गार साहित्यासाठीचे नोबेल पारितोषिक स्वीकारण्यासाठी स्टॉकहोमला १९६६ साली भेट देणारे जपानी कादंबरीकार वुई यांनी काढले होते.



काल्पनिक विश्व आणि वास्तव विश्व यांचे सरसहा मिश्रण करण्याची सेल्मा यांची लेखनधाटणी या त्यांच्या उदंड कीर्ती लाभलेल्या बालसाहित्यकृतीतही प्रतीत होते. नील्सचा आत्मकेंद्रीपणा गळून पडणे हा त्या ललितकृतीमधील नैतिक संदेश वगळता बाकी संपूर्ण कलाकृती निसर्ग आणि मानव यांच्यातील जैविक नाते विलक्षण हळुवारपणे, संवेदनशीलतेने अधोरेखित करते. निसर्गाशी माणसाच्या असलेल्या बहुपदरी नात्याचे त्याला प्रथम ज्ञान करून देते आणि ते नाते टिकविण्याचे भान त्याच्या मनावर बिंबवते. रंजनातून ज्ञान आणि ज्ञानाद्वारे प्रबोधन असा हा प्रवास होतो.

साहित्याच्या क्षेत्रातील या कामगिरीबद्दल १९०९ साली नोबेल पुरस्काराने सेल्मा यांना गौरविण्यात आले. पहिल्या महायुद्धाने मात्र सेल्मा यांच्या मनावर चांगलाच ओरखडा उठविला. युद्धाच्या दुष्परिणामांची रेखाटणे त्यांच्या त्या नंतरच्या साहित्यकृतींमध्ये शब्दबद्ध झालेली दिसतात. साहित्यभानाइतकेच सेल्मा यांचे समाजभानही लखलखीत होते. सोव्हिएत रशियाबरोबरील युद्धासाठी फिनलंडला अर्थसाहाय्य करण्याच्या ऊर्मीने, आपल्याला प्रदान करण्यात आलेले नोबेल पारितोषिकाचे पदक आणि एक सुवर्णपदक सेल्मा यांनी फिनलंड सरकारला धाडले. या त्यांच्या कृतीने भारावून गेलेल्या फिनलंडच्या सरकारने अन्य मार्गाने निधीसंकलन करून नोबेल पारितोषिकाचे पदक सेल्मा यांना आदरपूर्वक परत केले. नाझींच्या छळवादापासून बचाव व्हावा या हेतूने अनेक जर्मन बुद्धिवाद्यांना तसेच कलावंतांना जर्मनीतून निसटून जाण्यास सेल्मा यांनी दुस-या महायुद्धाच्या तोंडावर मदत केली. विख्यात कवयित्री नेली झाक्स यांच्यासाठी पारपत्राची तरतूद करून मृत्युछावणीत रवानगी होण्यापासून सेल्मा यांनी त्यांना वाचविले.

रंजनाद्वारे प्रबोधनाचे जणू व्रतच घेतलेल्या सेल्मा यांना ८१ वर्षांचे दीर्घायुष्य लाभले. अखेरपर्यंत त्या साहित्यसेवेतच मग्न राहिल्या. लघुकथांचा त्यांचा अखेरचा संग्रह त्यांच्या वयाच्या ७५ व्या वर्षी प्रकाशित झाला. १६ मार्च १९४० रोजी मृत्यूने गाठले तेव्हाही सेल्मा त्यांच्या कादंबरीवरच काम करीत होत्या ! ■■

# गिरविली मुळाक्षरे कादंबरीचीच....!


ग्राद्झिया दिलेद्दा(१८७१-१९३६)

पाळण्यात पाय दिसले होते की नाही ते माहित नाही. पण, साहित्यातील योगदानाबद्दल १९२६ सालचा नोबेल पुरस्कार मिळविणा-या इटालियन कादंबरीकार ग्राद्झिया दिलेद्दा (Grazia Deledda) यांना त्यांच्या कादंब-यांतील व्यक्तिरेखा त्यांच्या लहानपणीच गवसल्या होत्या. इटलीच्या सार्दिनिया प्रांतात असलेल्या नुरो या छोट्याशा गावात २७ सप्टेंबर १८७१ या दिवशी ग्राद्झिया यांचा जन्म झाला. त्यांचे वडील गावातील एक सुखवस्तु बागायतदार होते. ग्राद्झिया यांचे वडील मोठे पुस्तकप्रेमी होते. ते कविताही करीत. आपल्या स्वतःच्या कविता छापून प्रसिद्ध करण्यासाठी ग्राद्झिया यांच्या वडिलांनी स्वतःचा छापखानाच घातला होता. एक स्थानिक वृत्तपत्रही ते प्रकाशित करीत असत. वयाच्या १० व्या वर्षापर्यंत ग्रादझिया यांचे प्राथमिक शिक्षण नुरोमधील स्थानिक शाळेतच झाले. त्या पुढील त्यांचे सारे शिक्षण मात्र घरीच झाले. एक प्राथमिक शिक्षकच त्यांना घरी शिकवत असत. औपचारिक शालेय शिक्षणाशी ग्राद्झिया यांचा एवढाच काय तो संपर्क आला. इटालियन बरोबरच ग्राद्झिया यांनी फ्रेंच भाषाही आत्मसात केली. वाचनाचे प्रचंड वेड त्यांना बालपणापासूनच होते. सार्दिनियातील लोककथा, पारंपरिक आख्यायिका ऐकतच ग्रादझिया यांची बाळदशा सरत होती. ग्रादझिया यांच्या वडिलांचा मित्रपरिवार मोठा होता. आजुबाजूच्या गावांत पसरलेला वडिलांच्या मित्रांचा तो गोतवळा काही कामांनिमित्त नुरोला आला की ग्राद्झिया यांच्या घरीच त्यांची पथारी पडायची. वडिलांच्या या मित्रमेळ्यातच मला माझ्या कादंबरीतील व्यक्तिरेखा गवसू लागत, असे खुद्द ग्राद्झिया यांनीच त्यांच्या आत्मपर लेखनात एके ठिकाणी नमूद केलेले आहे.



वयाच्या आठव्या वर्षापासूनच काव्यरचना करणा-या ग्रादझिया यांच्यातील सुप्त लेखनगुण हेरले ते त्यांना घरीच शिकविणा-या त्यांच्या शिक्षकाने. लेखनकृतींसाठी तेच ग्राद्झिया यांना विषय सुचवायचे. घरीदारी, शेतावर काम करणारे कामकरी, शेतावरील मजूर, शेळ्यामेंढ्यांचे कळप घेऊन भ्रमंती करणारे मेंढपाळ यांच्याकडून ऐकलेल्या गोष्टींमधूनही ग्राद्झिया कथाबीजे टिपायच्या. या कथाबीजांमधूनच अंकुरलेल्या ग्राद्झिया यांच्या त्या वयातील काही कथा इतक्या सरस उतरल्या की त्या छापून प्रसिद्ध कराव्यात, असा त्यांच्या शिक्षकांनी आग्रहच धरला. आपण लिहिलेले हे सारे कोण छापेल याची, त्या वेळी अवघ्या १३ वर्षांच्या असणा-या ग्रादझिया यांना सुतरामही कल्पना असणे शक्यच नव्हते. योगायोगाने, फॅशन या विषयाला वाहिलेले एक नियतकालिक ग्राद्झिया यांच्या हाताला लागले. आपली एक लघुकथा त्यांनी त्या नियतकालिकाकडे धाडली.... आणि ती लगोलग छापूनही आली ! तिथून पुढे त्यांच्या लघुकथा रोम तसेच मिलान येथून प्रकाशित होणा-या नियतकालिकांमधून वाचकांसमोर येऊ लागल्या. पहिली लघुकथा प्रकाशित झाल्यानंतर अवघ्या आठच वर्षांत Flower of Sardinia ही आपली पहिलीवहिली कादंबरी ग्रादझिया यांनी रोममधील एका प्रकाशकाकडे धाडली. १८९२ साली प्रकाशित झालेल्या या कादंबरीचे चांगले स्वागत झाले. परंतु, 'एक यशस्वी कादंबरीकार', म्हणून ग्रादझिया यांची ओळख प्रस्थापित झाली ती मात्र १९०३ साली प्रकाशित झालेल्या Elias Portolu या त्यांच्या कादंबरीने.

सर्वसामान्य स्त्री-पुरुषांची जीवनरीती, ग्रामीण परंपरा हा ग्राद्झिया यांच्या चिरंतन आस्थेचा विषय. १९ व्या शतकातील इटलीच्या साहित्यविश्वात दृग्गोचर होणारी निसर्गवादी लेखनशैलीची चळवळ आणि अ-तार्किक शक्ती, प्रेम, अपराधी जाणिवा, सहजप्रवृत्तींचे आवाहन यांसारख्या भावभावनांचे रेखाटन साहित्यात करणारी शैली या दोन आविष्कार प्रवाहांच्या मधोमध कोठे तरी ग्राद्झिया यांचे अक्षरवाङ्‌मय हिंदोळते, असे निरीक्षण काही साहित्याभ्यासकांनी नोंदविलेले आहे. १८९९ साली नुरोमधून ग्राद्झिया यांचे पाऊल कायमचे बाहेर पडले तरी सार्दिनियाची भूमी हीच त्यांच्या आयुष्यभराच्या साहित्यसेवेची प्रेरणा राहिली.

चारचौघांसारखे जीवन जगणा-या प्रापंचिकांच्या मनोव्यापारांचा, अंतःकरणाचा थेट ठाव घेण्याची हातोटी लाभलेली असल्याने रोजच्या जगण्यातील सुखदुःखे, अडचणी हाच ग्राद्झिया यांच्या लेखनकृतींचा केंद्रबिंदू राहतो. प्रेम, वेदना, मृत्यू यांसारख्या जीवनातील निखळ सत्यावर चढविलेला शब्दसाज हे त्यांच्या लेखनविश्वाचे वैशिष्ट्य. माणूस आणि निसर्ग यांच्यातील प्रगाढ ऐक्याच्या विविध स्तरांचे सूक्ष्म रेखाटन करीत असतानाच, माणसाचा स्थळकाळ आणि भवताल यांच्यातील बहुपदरी नात्याचे चित्रण ग्राद्झिया यांच्या कादंब-यांमध्ये प्रामुख्याने आढळते. गाजलेल्या त्यांच्या बहुतेक सर्वच कादंब-यांमधून परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील संघर्ष, मोहवशतेला बळी पडण्याच्या मानवी शबलतेपायी ओढवणारी शोकात्मता, मानवी मनाच्या कोप-यांत दडून बसलेली अंधःश्रद्धा... असे नानाविध कल्लोळ पात्रांच्या व्यक्तिरेखांमधून सामोरे येतात. जवळपास ३७ वर्षे सार्दिनियापासून दूर राहूनही तिथले जीवन, परंपरा, लोकधारणा, लोककथांचा संभार यांतूनच ग्राद्झियांच्या सर्जनशीलतेला पोषकद्रव्यांचा पुरवठा होत राहिला.

सार्दिनियाच्या राजधानीतच ग्राद्झिया यांना त्यांचा जीवनसाथी लाभला. इटलीच्या अर्थ मंत्रालयात मध्यम श्रेणीतील प्रशासकीय अधिकारी असणा-या Palmiro Madesani यांच्याशी १९०० सालच्या जानेवारी महिन्यात ग्राद्झिया यांचा विवाह झाला. लग्नानंतर त्या उभयतांनी रोमला वास्तव्य करण्याचा निर्णय घेतला. पती आणि दोन मुलांसह ग्राद्झिया अखेरपर्यंत रोममध्येच राहिल्या. नोबेल पुरस्कार प्रदान झाल्यानंतर ग्राद्झिया यांचा इटलीचा सर्वेसर्वा बेनिटो मुसोलिनी यांनी सत्कार करू न गौरव केला. अशा हारतु-यांमधील वैय्यर्थ मनोमन उमगलेल्या ग्राद्झिया यांचे मन कोठल्याच सभासमारंभांमध्ये कधी रमले नाही. सत्कारानंतर ग्राद्झिया यांना काही भेट देण्याची इच्छा मुसोलिनी यांनी व्यक्त केली. त्या वेळीही ग्राद्झिया यांनी स्वतःसाठी काहीच मागितले नाही. उलट, इटलीतील फॅसिस्ट राजवटीविरुद्ध सक्रिय असल्याबद्दल कारावासात डांबण्यात आलेल्या Elia Sanna Mannironi या आपल्या मित्राची सुटका करण्यात यावी, अशी मागणीवजा इच्छा त्यांनी व्यक्त केली.



नोबेल पुरस्कार मिळाल्यानंतरचे ग्रादझिया यांचे लेखनही विपुल आहे. एकंदरीनेच, ग्राद्झिया यांची लेखणी बहुप्रसवा होती. ३० पेक्षा अधिक कादंब-या, सुमारे ४०० लघुकथा, अनेक लेख, एक नाटक, कविता, एक ऑपेरा असे बहुविध प्रकारचे साहित्य त्यांनी ६४ वर्षांच्या जीवनक्रमात निर्मिले. विशीच्या उंबरठ्यावर असतानाच त्यांनी लिहिलेल्या त्यांच्या पहिल्याच कादंबरीचा जवळपास सर्वच युरोपीय भाषांमधून अनुवाद झाला. खरे म्हणजे, इटलीच्या ज्ञानक्षेत्रातील अग्रणींनी नोबेल पुरस्कारासाठी ग्राद्झिया यांचे नामांकन १९१३ सालीच केले होते. प्रत्यक्षात, त्या नंतर १३ वर्षांनी त्यांना हा पुरस्कार मिळाला त्या वेळी एक यशस्वी लेखिका आणि कादंबरीकार असा लौकिक ग्राद्झिया यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राप्त झालेला होता. ललित लेखनाइतकाच त्यांचा पत्रव्यवहारही दांडगा होता. लोकाभिमुखतेबाबत एरवी अरु ची असणा-या ग्राद्झिया यांचा संपादक, अनुवादक, लेखक, मित्र, कुटुंबीय अशा विविध नात्यांनी जोडले गेलेल्यांबरोबर व्यापक पत्रसंपर्क होता. त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू त्यांत नजरेसमोर उलगडतात, असा काही अभ्यासकांचा अभिप्राय आहे.

परंतु, ग्राद्झिया या ख-या अर्थाने आत्ममग्नच होत्या. सार्वजनिक व्यासपीठांवरू न क्वचितच आपले विचार त्या मांडत. लेखन हेच त्यांच्या अभिव्यक्तीचे माध्यम होते. प्रसंगवशात लोकांत मिसळल्या तरी त्या आपले मितभाषीपण सोडत नसत. इटलीच्या बाहेरही त्या एकदाच पडल्या आणि तेसुद्धा नोबेल पारितोषिकाचा स्वीकार करण्यासाठी स्टॉकहोमला भेट दिली त्या वेळी. नोबेल पारितोषिकाचा स्वीकार करतेवेळी ग्राद्झिया यांनी केलेले भाषण हे, नोबेल स्वीकारताना केल्या गेलेल्या आजवरील भाषणांतील लघुतम म्हणूनच गणले जाते ! १५ ऑगस्ट १९३६ रोजी रोम येथेच निधन झाल्यानंतर ग्रादझिया यांची Cosima या शीर्षकाची जी कादंबरी प्रसिद्ध झाली ती बरीचशी आत्मपर आहे. एक कोणती तरी अदृश्य शक्ती आपल्याकडून लेखन करवून घेत आहे, अशा प्रकारची भावना त्या कादंबरीतील नायिका व्यक्त करते. अल्पतम औपचारिक शिक्षण लाभूनही विपुल आणि बहुरंगी साहित्यसंपदा निर्मिणा-या ग्राद्झिया यांची धारणाच त्या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून मुखर झाली असेल का ? ■■

# ....साकारले भावविश्व स्त्री-जगताचे



सिग्रिड उंडसेट (१८८२-१९४९)

एखाद्या कथेतील मुख्य पात्राने ‘मी माझ्या नव-याची प्रतारणा केली,’ या शब्दांत आपल्या कृतकर्माची कबुली द्यावी आणि ती देखील शंभर वर्षांपूर्वी - १९१०च्या दशकात - हे त्या काळी युरोपमध्येदेखील जरा धक्कादायकच होते. पण, मध्यरात्रीचा सूर्य दिसण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या नॉर्वे या देशातील कथालेखिका सिग्रिड उंडसेट (Sigrid Undset) यांच्या Fru Marta Oulie या पहिल्याच कादंबरीतील नायिका अशी कबुली देते. १९२८मध्ये नोबेल पुरस्कार मिळविणा-या यांच्या साहित्यात स्कॅन्डेनेव्हियन देशांमधील मध्ययुगीन जीवनाचे चित्रण आढळते. साहित्यनिर्मितीत पाऊल ठेवल्यानंतर त्यांच्या सुरुवातीच्या कथा-कादंब-यांमध्ये तत्कालीन विषयांना आणि (बहुधा तेव्हा नव्याने उदयास येत असलेल्या) निमशहरी/शहरी भागांतील स्त्री-जीवनाच्या प्रश्नांना स्थान देण्यात आल्याचे दिसते. तत्कालीन युरोपमध्येही तेव्हा स्त्रियांचे कार्यक्षेत्र हे प्रामुख्याने घर-संसार हेच होते. त्यामुळे या परंपरागत भूमिकेला आव्हान देण्याचा प्रयत्न करणा-या किंवा या संदर्भात आपल्या अंतर्मनाविरुद्ध वागण्याचा प्रयत्न करणा-या स्त्रियांची कशी परवड होते, याचे दर्शन त्यांच्या नायिका घडवतात.

डेन्मार्क येथे जन्मलेल्या सिग्रिड यांना खरे तर व्हायचे होते ऐतिहासिक कादंबरीकार. त्याला कारणही तसेच होते. त्यांचे वडील होते पुरातत्वसंशोधक आणि आई होती वकील. सिग्रिड यांच्यावर वडिलांचा प्रभाव असल्याने मध्ययुगीन काळातील इतिहास, स्कॅन्डेनेव्हियन देशांमधील पुराणकथा, मिथके यांबाबत त्यांच्या मनात एक प्रकारचे आकर्षण होते. तर, आईकडून त्यांना मिळाला होता जगाबद्दलचा एक व्यावहारिक दृष्टिकोण.



मात्र, धर्माबाबतच्या आईच्या परखड भूमिकेपासून चार हात दूरच राहणे त्यांनी पसंत केले. वडिलांचे निधन झाल्यानंतर आर्थिक गरजेपोटी सिग्रिड यांना लहान वयातच नोकरी करावी लागली. वडिलांच्या कामाचे त्यांना इतके आकर्षण होते की वडिलांनी जमविलेले पुरातत्वविषयक जे काही सामान त्यांच्या आईने आर्थिक कारणासाठी विकले होते ते सिग्रिड यांनी परत मिळविले. दुसरीकडे, नोकरी सांभाळून त्यांनी एक ऐतिहासिक कादंबरीही लिहून पूर्ण केली. पण प्रकाशनसंस्थेने त्यांना निराश केले आणि ‘ऐतिहासिक कादंबरी लिहिण्याचा पुन्हा प्रयत्नही करू नका, तुमच्याकडे ती क्षमता नाही. पण जरा आधुनिक विषय लिहून पाहा,’ असा अनाहूत सल्लाही वर दिला. या घटनेनंतर त्यांची Fru Marta Oulie ही पहिली कादंबरी १९०७मध्ये, १९०८मध्ये एक लघुकथासंग्रह व १९०९मध्ये एक लघुकादंबरी प्रसिद्ध झाली. या लघुकादंबरीमुळे त्यांना सरकारी शिष्यवृत्ती मिळाली. या नंतर त्यांनी नोकरी सोडून लेखनाला वाहून घेतले. या शिष्यवृत्तीमुळे जर्मनी आणि इटली या देशांमध्ये त्यांना प्रवासही करता आला. दरम्यान, रोम या ऐतिहासिक शहराचे आकर्षण वाटून त्यांनी तेथे अल्प काळ वास्तव्य केले. पुढे एका कलासक्त तरुणीची कारूण्यपूर्ण असलेली प्रेमकहाणी ‘जेनी’ ही त्यांची कादंबरी १९११मध्ये प्रसिद्ध झाली. स्त्रीचे भावविश्व उलगडणा-या या कादंबरीत प्रेम की कला, या कात्रीत सापडलेल्या तरुणीची कहाणी आहे. या कथेतील नायिकेच्या प्रियकराचे वडील अयशस्वी कलाकार असतात. त्यांनी आपल्या पत्नीपासून दूर होण्याचा निर्णय घेतला असला तरी कथानायिकेला-जेनीला- त्यांच्याबरोबर विवाह करायचा नसतो. दुसरीकडे आपल्या आळशी प्रियकरापासून जेनी दूर झालेली असते. अखेरीस ती आत्महत्येचा मार्ग पत्करते.

या कादंबरीनंतर नंतर सिग्रिड यांनी (रोममध्ये भेटलेल्या) नॉर्वेजियन चित्रकार Anders Castus Svarstad यांच्याबरोबर १९१२मध्ये विवाह केला आणि ते दोघे पुन्हा नॉर्वेला परतले. तेथे दोघांनी आपापले कार्य चालू ठेवले. पुनर्विवाहित असलेल्या Svarstad यांना पहिल्या पत्नीपासून झालेली तीन मुले होती. पत्निपदाच्या कर्तव्यनिष्ठेला जागून सिग्रिड यांनी या तीन मुलांचे मातृत्व स्वीकारले व मुलांसह घराची व्यवस्थित काळजी घेतली.

या विवाहसंबंधातून त्यांना दोन मुले व एक मुलगी झाली. त्यांची कन्या मतिमंद होती. १९१९मध्ये हे दोघे विभक्त झाले तरी सिग्रिड यांच्या घरी नव-याचे व सावत्र मुलांचे येणे-जाणे होते. व्यक्तिगत जीवनात व लेखनातही सिग्रिड यांचा कल गृहस्थजीवनाच्या बाजूनेच होता. Splinten Av Troldspeilet (Images in Mirror) या १९१७मध्ये प्रसिद्ध झालेल्या कादंबरीत, विविध कामे करण्यासाठी स्त्रियांसमोर असलेल्या नवीन संधी आणि घराबाबतची त्यांची परंपरागत कर्तव्ये, हाच विषय त्यांनी प्रामुख्याने मांडला होता. आईवडील निरीश्वरवादी असल्याने त्यांच्या विचारांचा प्रभाव सिग्रिड यांच्यावर होता. पण व्यक्तिगत जीवनातील काही प्रसंगांमुळे त्यांचे विचार बदलले. मानवी बुद्धीच्या आणि तार्किकतेच्या आधारे ज्याचा विचार करता येत नाही असे काही गूढ जीवनात असावे/असते, असे त्यांना वाटू लागले होते. त्यामुळे की काय, पण १९२४मध्ये त्यांनी कॅथॉलिक धर्म स्वीकारला. या नंतरच्या त्यांच्या कथा-कादंब-यांमधून धर्मविषयक बाबींसंदर्भातील उल्लेख अधिक आढळतात. प्रबोधनकाळातील मूल्यांचा परिणाम संपूर्ण युरोपमध्ये जाणवत असताना त्यांनी कॅथॉलिक धर्म स्वीकारल्याने त्या काळी अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्या होत्या.

Kristin Lavransdattir ही त्यांची trilogy (म्हणजे एकाच विषयाला धरून असलेली तीन वेगवेगळी पुस्तके) १९२० मध्ये प्रसिद्ध झाली. तेराव्या व चौदाव्या शतकातील (कॅथॉलिक ) नॉर्वेमधील स्त्री-जीवनाचे चित्रण या तीन कादंब-यांमधून होते. जमीनदाराची कन्या असलेली Kristin हिच्या बालपणापासून तारुण्यापर्यंतचा प्रवास The Bridal Wreath या पहिल्या कादंबरीतून उलगडतो. The Mistress of Husaby आणि The Cross ही पुस्तके Kristinच्या वैवाहिक जीवनाचे चित्र उभे करतात. एकीकडे पतीबरोबर असलेले प्रेमाचे संबध आणि त्याच वेळी (तिला साजेशा नसलेल्या) पतीबाबतचा तिरस्कार यात अडकलेल्या कथानायिकेची विफलतापूर्ण कहाणी या ग्रंथांमधून पुढे येते. १९२४-२७ या काळात त्यांची tetralogy (म्हणजे एकाच विषयावर आधारित असलेली चार वेगवेगळी पुस्तके) प्रसिद्ध झाली. मध्ययुगीन काळाला धरून असलेल्या या कादंब-यांमध्ये प्रेम, धर्म यांच्याबरोबरीने काही प्रमाणात सूड/हिंसाही आढळते.



The Master of Hestviken या नावाने या कादंब-यांचे इंग्रजीत भाषांतर झाले. त्यांना नोबेल पुरस्कार मिळवून दिला तो याच दोन कादंब-यांनी. या नंतरच्या काळातील त्यांच्या पुस्तकांमध्ये तत्कालीन समाजाचे चित्रण आढळते. The Wild Orchid आणि The Burnimg Bush या कादंब-यांमधून धर्म हा विषय गुंफण्यात आला आहे.

लेखनाला वाहून घेतलेल्या सिग्रिड यांना १९२०च्या दशकात लेखनातून चांगले उत्पन्न मिळू लागले होते. १९२८ मध्ये मिळालेल्या नोबेल पुरस्काराच्या एकूण रक्कमेतील काही भाग त्यांनी मतिमंदांच्या संस्थेसाठी दिला. नोबेल पुरस्काराचे पदक विकून मिळालेली रक्कम त्यांनी फिनलंड आणि तत्कालीन सोव्हिएत रशियातील युद्धाच्या वेळी (१९३९) फिनिश मुलांच्या मदतीसाठी दिली. लेखनकार्यात मग्न असतानाही आंतरराष्ट्रीय परिस्थितीबाबत त्या सजग होत्या. नाझींच्या विरोधात त्यांनी टीका केली. त्या काळात त्यांच्या कादंब-यांवर जर्मनीने बंदी घातली होती. दुस-या महायुद्धाच्या काळात नॉर्वे व जर्मनीदरम्यानचे ताणलेले संबंध लक्षात घेऊन नॉर्वेच्या सरकारने त्यांना देश सोडून जाण्याची विनंती केली होती. त्यामुळे काही काळ त्यांनी अमेरिकेत राजकीय आश्रय घेतला होता.

इतिहास आणि मानसशास्त्र या विषयांबाबत त्यांनी बारकाईने विचार केला होता असे त्यांच्या कथा/कादंब-यांवरून दिसून येते. माणसामाणसांमधील संबंधांचा विचार करताना व्यावहारिक दृष्टिकोणाला/वर्तनाला त्यांनी प्राधान्य दिले. इंग्रजी साहित्य वाचनाची त्यांना आवड होती. विशेषतः, शेक्सपिअरचे साहित्य त्यांना प्रिय होते. आपल्या घरात व लेखनात रमणा-या सिग्रिड या आयुष्यभर पत्रकारांपासून कटाक्षाने दूरच राहिल्या. निसर्गतः मिळालेले मातृत्त्व हीच स्त्रियांसाठी सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे, असे त्यांचे मत होते. हे त्यांचे मत अनेकांना पटले नव्हते. त्या काळातील नॉर्वेमधील स्त्रियांच्या मनात 'घर' की 'करियर' असा संघर्ष चालू असावा आणि त्याचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात उमटले असावे. पण घराबाहेर पडून अर्थार्जन करण्यापेक्षा घरात समाधान शोधण्याचाच प्रयत्न त्यांच्या नायिकांनी केला. साहित्यविश्वातील सिग्रिड हा तारा १९४९ मध्ये निखळला. ■■

# पूर्व आणि पश्चिमेदरम्यानचा साहित्यसेतू



पर्ल बक (१८९२-१९७३)

पहिलीवहिली साहित्यकृती प्रकाशित झाल्यापासून अवघ्या दहा वर्षांच्या आतच साहित्यातील नोबेल पुरस्काराला गवसणी घालणे, ही काही साधारण कामगिरी नोहे. परंतु, 'साधारण' अथवा 'सामान्य' हा शब्दच जणू पर्ल बक(Pearl Buck) यांच्या शब्दकोशात छापला गेला नसावा! अगदी लहानपणापासूनच त्यांच्या बाबतीतील सगळेच 'अ-साधारण' या गटात मोडणारेच ठरले. अन्यथा, अमेरिकेत जन्म झालेली एखादी मुलगी प्रथम चिनी भाषा सराईतपणे बोलायला लागते, या वास्तवाचे वर्णन अन्य शब्दांत कसे करणार ? अमेरिकेच्या पश्चिम व्हर्जिनिया प्रांतातील हिल्सबरो येथे २६ जून १८९२ रोजी जन्म झालेल्या पर्ल यांना घेऊन त्यांचे आईवडील चीनला रवाना झाले त्या वेळी तान्ही पर्ल होती अवघी तीन महिन्यांची. आपल्या आयुष्यातील पहिल्या ४० वर्षांपैकी बहुतांश काळ पर्ल यांनी चीनमध्येच व्यतीत केला. पर्ल यांचे आईवडील धर्मोपदेशक होते. गंभीर प्रकृती-प्रवृत्ती असणा-या वडिलांना विनोदाचे तसे वावडेच होते. ग्रीक भाषेतील बायबलचा अनुवाद चिनी भाषेत करण्याची तपश्चर्या पर्ल यांच्या वडिलांनी अनेक वर्षे केली. ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केलेल्या चिनी नागरिकांना धर्मपर व्याख्याने देत गावोगाव भ्रमण करणारे पर्ल यांचे वडील बहुतेक वेळा घरापासून दूरच असत. वयाच्या तिस-या महिन्यापासूनच चिनी मातीचा गंध अनुभवणा-या लहानग्या पर्लने इंग्रजी शब्द शिकण्यापूर्वीच चिनी भाषा आत्मसात केली होती. पर्ल यांची आई साहित्यप्रेमी होती. तारुण्यात भरपूर प्रवास करून अनुभवांचे संचित त्यांनी आपल्या गाठीशी जमवले होते. चिनी महिलांना आपल्या घरगुती दवाखान्याद्वारे त्या औषधोपचार देत.



इतर लहान मुलांना उपभोगावयास मिळते असे स्थिर, शांत बालपण पर्ल यांच्या वाट्याला काही आले नाही. चीनमधील तत्कालीन सामाजिक अस्थिरता, स्थानिक बंडाळ्या यांपायी सक्तीचे स्थलांतर त्यांच्या नशिबी होते. पर्ल यांचे सुरुवातीचे शिक्षण त्यांच्या आईच्या देखरेखीखाली घरीच झाले. आईच्या जोडीनेच एक चिनी शिक्षकही प्राथमिक शिक्षणाचे पाठ पर्ल यांना घरीच देत असे. चिनी तत्त्वज्ञ कन्फ्युशिअस यांचे विचारधन हा या शिक्षक महाशयांच्या विशेष व्यासंगाचा प्रांत होता. वयाच्या १५ व्या वर्षी, पुढील शिक्षणासाठी पर्ल यांची रवानगी शांघायमधील एका निवासी शाळेमध्ये करण्यात आली. उच्च शिक्षणासाठी व्हर्जिनिया येथील महाविद्यालयात पर्ल दाखल झाल्या त्या १९१० साली. मानसशास्त्र विषय घेऊन १९१४ साली त्या पदवीधर झाल्या. त्यांना खरे तर अमेरिकेतच राहायचे होते. परंतु, आई गंभीर आजारी असल्याचे कळल्याने त्या पुन्हा चीनला परतल्या. पुढे एकाच वर्षात, म्हणजे, १९१५ साली कॉर्नेल विद्यापीठातून कृषी अर्थशास्त्राची पदवी घेतलेल्या डॉ. जॉन बक यांच्याशी त्यांची भेट झाली आणि त्या स्नेहाची परिणती झाली ती १९१७ साली झालेल्या त्यांच्या विवाहात.

लग्नानंतर हे दांपत्य स्थिरावले ते उत्तर चीनमधील एका खेडेगावात. शिक्षिकेचे काम करत असतानाच, दुभाषा म्हणून आपल्या नव-याच्या कामातही पर्ल साहाय्य पुरवत असत. कामाच्या निमित्ताने चीनच्या ग्रामीण भागात त्या उभयतांची भरपूर भ्रमंती झाली. ज्या खेड्यात त्यांचे वास्तव्य होते त्या खेड्यातील विपन्नावस्थाही पर्ल जवळून निरखत होत्या. पुढे त्रिखंडात गाजलेल्या त्यांच्या 'द गुड अर्थ' या कादंबरीची कच्ची सामग्री या रूपाने त्यांच्या पदरी जमा होत होती. १९२१ साली पर्ल यांच्या आईंचे निधन झाले आणि त्याच वर्षी त्यांच्या पहिल्या अपत्याचा जन्मही झाला. दुर्दैवाने, ही मुलगी जन्मतःच मतिमंद होती. क्षयाचा संसर्ग झाल्याने पर्ल यांचे गर्भाशयही शस्त्रक्रिया करून काढून टाकावे लागले. मानसिक आणि शारीरिक आघातांचा सामना करणा-या पर्ल यांचे वैवाहिक जीवनही सुखासमाधानाचे नव्हते. अखेर, मुलीच्या उपचारांसाठी १९२४ साली पर्ल पुन्हा अमेरिकेला परतल्या.

मुलीचे उपचार एकीकडे चालू असतानाच पर्ल यांनी कॉर्नेल विद्यापीठात पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. 'साहित्य' हाच विषय घेऊन १९२६ साली पर्ल यांनी एम.ए. पूर्ण केले. त्या पुन्हा चीनला गेल्या. वडिलांची व्यासंगी वृत्ती, साहित्यप्रेमाचा आईकडून मिळालेला वारसा, मानसशास्त्रातील पदवी आणि साहित्याचे पदव्युत्तर शिक्षण ही सारी पुंजी पर्ल यांच्यातील संवेदनशील साहित्यिकाचे भरणपोषण करत होती. लेखनाच्या प्रांतातील पर्ल यांच्या मुलुखगिरीला प्रारंभ झाला तो १९२०च्या दशकात. कथा, लघुकथा, निबंध यांसारखे साहित्यप्रकार हाताळत पर्ल यांची ही वाटचाल चालू होती. East Wind, West Wind ही पर्ल यांची पहिली कादंबरी प्रकाशित झाली ती १९३० साली. त्या नंतर केवळ आठच वर्षात पर्ल यांना नोबेल पारितोषिकाने गौरविण्यात आले. दरम्यान, १९३५ साली पर्ल आणि डॉ. जॉन बक विभक्त झाले.

पर्ल यांच्या साहित्यिक कामगिरीचा जणू मुकुटमणीच ठरलेली साहित्यकृती म्हणजे १९३१ साली प्रकाशित झालेली त्यांची दुसरी कादंबरी 'द गुड अर्थ'. जॉन डे कंपनीने ही कादंबरी प्रकाशित केली. पदार्पणातच प्रचंड वाचकमान्यता तिला लाभली. प्रकाशित झाल्या झाल्या १९३१ सालीच या कादंबरीच्या तब्बल १८ लाख प्रती विकल्या गेल्या ! १९३२ या वर्षासाठीच्या पुलित्झर पारितोषिकाचीही ती मानकरी ठरली. जगभरातील ३० पेक्षा अधिक भाषांमध्ये अनुवाद झालेल्या या साहित्यकृतीवर १९३७ साली चित्रपटही निघाला. 'द गुड अर्थ'च्या कथानकाची संपूर्ण पार्श्वभूमी आहे चीनमधील. दोन वेळच्या जेवणाचीही भ्रांत असलेल्या एका चिनी शेतक-याचा जीवनप्रवास ही या कादंबरीची कथावस्तू. विपन्नावस्थेपासून लब्धप्रतिष्ठित जमीनदारापर्यंत या शेतक-याचा झालेला प्रवास पर्ल या कादंबरीत विलक्षण तरलतेने शब्दबद्ध करतात. या संपूर्ण अवस्थांतरादरम्यान त्या शेतक-याच्या उभ्या मूल्यव्यवस्थेत घडून आलेले आमूलाग्र परिवर्तन आणि हयातभर ज्या जमिनीची सेवा आपण केली त्या काळ्या आईमध्ये आपल्या मुलालेकरांचे आतडे काही गुंतलेले नाही, हे दाहक वास्तव ध्यानात येताच अंतर्बाह्य उन्मळून पडलेला तो शेतकरी यांचे प्रत्ययकारी वर्णन हा पर्ल यांच्या या लेखनकृतीचा कणा.




साहित्यमूल्याइतकेच 'द गुड अर्थ'चे सामाजिक मूल्यही अनोखे ठरले. पूर्वेकडील समाजजीवनात डोकवून बघण्याचा जणू झरोकाच या कादंबरीने पाश्चात्यांना उघडून दिला. चीन, चीनमधील समाजजीवन, सर्वसामान्य चिनी माणसाचे जगणे, ग्रामीण चीनमधील सर्वसामान्यांचा जीवनसंघर्ष... या कशाकशाचा म्हणून परिचय नसलेल्या पश्चिमी देशांना 'द गुड अर्थ'ने चीनची अंतर्बाह्य ओळखच घडविली. किंबहुना, पर्ल यांच्या एकंदर सा-याच लेखनाची मुख्य प्रेरणा तीच असल्याचे दिसते. चीन, कोरिया, भारत यांसारख्या पौर्वात्य देशांमधील सामाजिक विश्वाबद्दल कमालीची आस्था असलेल्या पर्ल पूर्व आणि पश्चिमेला एकमेकांच्या जवळ आणून परस्परांना जाणून घेण्यासाठी साहित्याचा सेतूच जणू निर्माण करत होत्या.

अमेरिकेत स्थायिक झाल्यावर स्त्री अधिकारांची चळवळ तसेच मानवाधिकारांच्या चळवळीत पर्ल अखेरपर्यंत कार्यरत राहिल्या. जॉन डे कंपनीचे अध्यक्ष तसेच प्रकाशक रिचर्ड वॉल्श यांच्याशी पुनर्विवाह केल्यानंतर या उभयतांनी East and West Association या संस्थेची स्थापना केली. पाश्चिमात्य देश आणि आशिया खंडादरम्यान सांस्कृतिक सामंजस्य आणि बहुआयामी देवाणघेवाण प्रस्थापित व्हावी, या हेतूने कार्यरत राहणे, हे या संस्थेचे उद्दिष्ट होते. आशियाई तसेच अन्य मिश्रवंशीय मुलांच्या दत्तकविधानाबाबत तत्कालीन व्यवस्थेत सर्वसाधारण असलेली सांस्कृतिक-सामाजिक प्रतिकूल मानसिकता ध्यानात घेऊन, आंतरराष्ट्रीय आणि आंतरवंशीय दत्तकविधानांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने Welcome House या आद्य संस्थेची पर्ल आणि रिचर्ड यांनी पायाभरणी केली. तिच्या माध्यमातून सुमारे पाच हजार मुलांचे दत्तकविधान त्यांनी पार पाडले.

या पृथ्वीतलावरील विस्मयकारक जीवनातच आकंठ डुबल्यामुळे याच्या पलीकडे 'स्वर्ग' नावाची काही चीज असेल असे वाटत नाही. त्यामुळे, पृथ्वीवरील हेच जगणे सर्वांगसुंदर बनवण्यासाठी झटणे हेच मानवी श्रेय होय, या कन्फ्युशिअस यांच्या वचनावर पर्ल यांची दृढ श्रद्धा होती. ८० हून अधिक पुस्तके, नाटके, लघुकथा, कविता, बालसाहित्य, चिनी साहित्याचे अनुवाद, चरित्रे... असे साहित्याचे नाना प्रकार पर्ल यांनी हाताळले ते बांधिलकीच्या याच जाणिवेतून ! ■■

# कविता वेदनेच्या आणि प्रेमाच्या....



गेब्रिएल मिस्ट्राल (१८८९-१९५७)

वेदनेने शब्दरूप धारण करावे आणि लेखणीतून काव्यधारा बरसत जाव्यात असे काहीसे घडले आणि गेब्रिएल मिस्ट्राल (Gabriel Mistral) या कवयित्रीचा जन्म झाला.१९४५मध्ये साहित्याचा नोबेल पुरस्कार मिळविणारी लॅटिन अमेरिकेतील - चिली देशातील ही पहिलीच महिला. त्यांची भाषा स्पॅनिश. राजदूताच्या समकक्ष असे कार्य करणा-या गेब्रिएल मिस्ट्राल यांचे मूळ नाव लुसिला गोडॉय अल्कायागा. पण काव्यलेखनासाठी घेतलेल्या गेब्रिएल मिस्ट्राल या टोपण नावानेच त्या प्रसिद्ध झाल्या. इटलीमधील लेखिका 'गेब्रिएल द ॲन्युझिओ' आणि फ्रेंच कवी 'फ्रेडरिक मिस्ट्राल' यांच्या नावांमधून 'गेब्रिएल' आणि 'मिस्ट्राला हे शब्द घेऊन त्यांनी आपले टोपण नाव तयार केले. १९०८पासून टोपण नावानेच त्या प्रसिद्ध झाल्या.

गेब्रिएल यांचा जन्म सामान्य घरातला. त्यांचे वडील शिक्षक होते आणि काव्यावर त्यांचे प्रेम होते. काव्य व शिक्षण यांचे संस्कार गेब्रिएल यांना घरातून मिळाले होते. बालपणापासूनच्या गेब्रिएल यांच्या आयुष्याला दुःखाची किनारच होती. त्या तीन वर्षांच्या होत्या तेव्हाच त्यांचे वडील घर सोडून निघून गेले होते. पण जाण्याआधी त्यांनी आपल्या चिमुकलीसाठी एक बाग तयार केली होती. त्या बागेत लहानग्या गेब्रिएलचा वेळ मजेत जात असे. त्यामुळे बालपणापासूनच त्यांच्या मनात निसर्ग कोरला गेला होता. तारुण्यात त्यांचे प्रेम जडले एका रेल्वेकर्मचा-यावर. पैशाची अफरातफर करण्यावरून एका गुन्ह्यात सापडल्यानंतर त्याने आत्महत्या केली. या घटनेचा इतका मोठा परिणाम गेब्रिएल यांच्या मनावर झाला की त्यानंतर त्यांनी कधी लग्नाचा विचारच केला नाही.



ही दुर्दैवी घटना विसरण्याचा प्रयत्न करीत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले आणि शिक्षकी पेशा स्वीकारला. तारुण्याचा उंबरठा ओलांडून मध्यमवयाकडे वाटचाल करताना काव्य व शिक्षण हे दोन मार्ग त्यांच्यासमोर होते. या दोन्ही मार्गावरील त्यांचा प्रवास एकाच वेळी झाला. अनेक चांगल्या शाळांमध्ये त्यांनी नोकरी केली. १९२१मध्ये त्या एका प्रसिद्ध शाळेच्या मुख्याध्यापक बनल्या. १९०६ ते १९२२ या काळात त्यांचे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. १९१४मध्ये प्रसिद्ध झालेल्या SONETTOS DE LA MUERTE (Sonnets of Death) या काव्यसंग्रहाला चिलीमधील मोठा पुरस्कार मिळाला आणि कवयित्री म्हणून त्यांना मान्यता मिळाली. प्रिय व्यक्तीच्या निधनानंतर त्याच्या स्मरणार्थ लिहिलेल्या या प्रेमकविता होत्या. त्यांच्या काव्यात सहजता होती आणि भाषाही साधी असली तरी तिच्यात भावनेचा ओलावा भरपूर होता. स्पॅनिश भाषेतील DESOLACION या दुस-या काव्यसंग्रहाने त्यांचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचले. मृत्यू आणि खिस्ती धर्मातील श्रद्धा हे दोन विषय या काव्यसंग्रहातून प्रामुख्याने पुढे येतात. मृत्यूनंतर एक सुंदरशी भूमी तुमच्यापुढे येईल (देवावर विश्वास ठेवून तिथे पाऊल टाका), असे त्या सांगतात. श्रद्धा हा विषय त्यांनी मांडल्याने त्यांच्या काही कवितांमधून प्रार्थनेचा सूरही डोकावतो.

प्रेम, मातृप्रेम, निसर्ग या विषयांबरोबर प्रिय व्यक्तींच्या मृत्युनंतर त्यांनी अनुभवलेले दुःख त्यांच्या कवितांमधून पुढे आले. तर, काही कवितांमधून त्यांनी बालपणीच्या आठवणी जागविल्या आहेत. जीवन किती नाजूक, क्षणभंगूर आहे हे सांगताना त्यांना स्ट्रॉबेरीसारख्या छोट्याशा फळाशी उपमा सुचते. म्हणून हे फळ नाजूकपणे हातात घ्या आणि अलगद खा असे त्या सहजपणे सांगून जातात. जीवन ही एक यात्रा आहे व त्या यात्रेचा शेवट मृत्यूने होतो आणि मग तुम्हाला जगापासून मुक्ती मिळते, असे त्यांनी काही कवितांमधून सुचविले आहे. त्यांच्या कवितांना वेदनेची व दुःखाची किनार आहे. कारण, त्यांच्या प्रियकराने आत्महत्या केली होती. तसेच त्यांनी दत्तक घेतलेल्या मुलाने तरुणवयातच आत्महत्या केली होती. शिवाय, त्यांच्या मित्रपरिवारातील एका जोडप्यानेही आत्मघाताचाच मार्ग स्वीकारला होता.

वैयक्तिक जीवनात अशी दुःखे भोगणा-या गेब्रिएल यांचे ११ काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले होते. १९२४मध्ये प्रसिद्ध झालेल्या Termura (Tenderness) या काव्यसंग्रहात बालपण आणि मातृप्रेम या विषयावरील कविता होत्या. हाच विषय पुढे नेणारा त्यांचा Tala हा काव्यसंग्रह १९३८मध्ये प्रसिद्ध झाला होता. लॅटिन अमेरिकेतील लोककथा आणि स्थानिक परंपरा यांबाबतचा उल्लेखही या काव्यसंग्रहात होता. या काव्यसंग्रहाच्या विक्रीतून उपलब्ध झालेल्या निधीचा उपयोग स्पॅनिश नागरी युद्धामुळे अनाथ झालेल्या बालकांना आधार देण्यासाठी गेब्रिएल यांनी केला.

लॅटिन अमेरिकेतील निसर्ग त्यांना प्रिय होता आणि निसर्गाबाबतचे त्यांचे प्रेम काही कवितांमधून व्यक्त झाले होते. इंग्लिश, स्पॅनिश, इटालियन, जर्मन, स्वीडिश इत्यादी भाषांमध्ये त्यांच्या काही कवितांचे अनुवाद झाले होते. चिलीमधील आणखी एक साहित्यिक पाब्लो नेरुदा यांना १९७१मध्ये साहित्याचा नोबेल पुरस्कार मिळाला होता. नेरुदा यांचे शालेय शिक्षण चालू असताना गेब्रिएल प्रसिद्ध शिक्षिका होत्या. साहित्यविश्वात पदार्पण करण्यासाठी त्यांनी नेरुदा यांना प्रोत्साहन दिले होते. गेब्रिएल यांचे निधन १९५७मध्ये झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या समग्र साहित्याविषयीचा एक ग्रंथ १९५८मध्ये प्रसिद्ध करण्यात आला होता.

शिक्षण व सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांची कामगिरीही उल्लेखनीय होती. शिक्षणक्षेत्रात काही सुधारणा घडवून आणण्यासाठी मेक्सिकोच्या सरकारने त्यांना पाचारण केले होते (१९२२). त्या काळात गेब्रिएल यांनी मेक्सिकोतील गरीबांसाठी फिरत्या वाचनालयांची योजना राबविली होती. ही योजना त्या काळात अभिनवच होती. याच काळात त्यांनी काव्य व कथा यांचा संग्रह असलेल्या 'रीडिंग्ज फॉर विमेन' या पुस्तकाचे संपादन केले. शालेय शिक्षणासंदर्भात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल 'टीचर ऑफ द नेशन' असे म्हणून चिलीच्या सरकारने १९२३मध्ये त्यांचा सत्कार केला होता. 'लीग फॉर इंटेलेक्चुअल को-ऑपरेशन ऑफ द लीग ऑफ नेशन्स' यासाठी चिलीच्या सरकारतर्फे कार्य करीत असताना (१९२५ ते १९३४ या काळात) वृत्तपत्रे आणि मासिके यांमधून त्यांचे सुमारे १०० लेख प्रसिद्ध झाले.



चिलीच्या परराष्ट्र विभागात त्यांचा प्रवेश १९३३मध्ये झाला. राजदूताचा समकक्ष अधिकारी या नात्याने त्यांनी परदेशांत चिलीचे प्रतिनिधित्व केले होते. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ 'गेब्रिएल मिस्ट्राल इंटर-अमेरिकन प्राइज फॉर कल्चर' असा पुरस्कार १९७९मध्ये चालू करण्यात आला आहे. 'हिज नेम इज टुडे' असे त्यांचे एक विधान नेहमी इंग्रजी भाषेत उद्‌धृत केले जाते. ते असे - ''अनेक चुका आणि त्रुटी यांसाठी आपण अपराधी असतो. पण आपला सर्वांत मोठा अपराध हा बालकांकडे दुर्लक्ष करण्याचा असतो. जगातल्या अन्य सर्व बाबी थांबू शकतात, परंतु, मुले त्याला अपवाद होत. त्यांचे मन, शरीर, बुद्धी, सभोवतालच्या जगाबाबतच्या संवेदना तयार होण्याचा काळ फार महत्त्वाचा असतो. त्यांच्या गरजांना ताबडतोब प्रतिसाद देणे हे आपले कर्तव्य आहे. 'ते उद्या पाहू' असे म्हणता येत नाही. कारण, मूल हे वर्तमान आहे. ज्या काळाला आपण 'उद्या' असे उत्तर देऊ शकत नाही तो काळ 'आज'चा असतो.'' असा विचार करणा-या गेब्रिएल या खरोखरच मातृहृदयी व हाडाच्या शिक्षिका होत्या. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५** **किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

# उमटली वेदना छळाची



नेली झाक्स (१८९१-१९७०)

'काळ आला होता, पण वेळ आली नव्हती', असा अनुभव घेण्याच्या टप्प्यात पोहचलेल्या जर्मनीतील कवयित्री व नाटककार नेली झाक्स (Nelly Sachs) यांचा साहित्यिक प्रवास सुरू झाला तो वयाच्या पन्नाशीकडे वाटचाल करताना. नाझींचा उदय झाल्यानंतर ज्यू धर्मीयांचे हत्याकांड घडवून आणले जात होते तेव्हा हजारो ज्यूंची रवानगी छळछावणीत केली जात होती. अशाच एका छळछावणीत जाण्यासाठी नेली झाक्स यांचेही नाव यादीत लागले होते. पण छळछावणीत रवानगी होण्याच्या फक्त सात दिवस आधी नेली झाक्स यांना आपल्या मातेसह स्वीडनमध्ये राजकीय आश्रय घेण्याची विशेष परवानगी मिळाली (१९४०). त्यानंतर पुढे स्वीडनचे नागरिकत्वदेखील मिळाले. साहित्यातील नोबेल पुरस्कार मिळालेल्या पहिल्याच लेखिका सेल्मा लागरलोफ् या स्वीडनच्या रहिवासी होत्या. त्यांची Gosta Berling ही कादंबरी वाचल्यानंतर नेली यांचा त्यांच्याबरोबर पत्रव्यवहार चालू झाला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळेच नेली स्वीडनमध्ये पोहचू शकल्या. पण त्या पोहचेपर्यंत सेल्मा लागरलोफ् यांचे दुर्दैवाने निधन झाले होते.

जर्मनीत असतानाच नेली यांचे लेखन चालू झाले होते. पण, त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीला खरा बहर आला स्वीडनमध्ये. मात्र त्यांच्या साहित्यातून वेदनाच उमटली. जवळजवळ सर्वच नातेवाईकांचा मृत्यू छळछावणीत झाल्याचे समजल्यानंतर त्यांचे हृदय विषण्ण होणे स्वाभाविकच होते. १९६६मध्ये त्यांना साहित्याचा नोबेल पुरस्कार मिळाला. तो स्वीकारतानादेखील ''मी ज्यू नागरिकांच्या वेदनांचे प्रतिनिधित्व करते आहे,'' असेच उद्‌गार त्यांनी काढले होते.



येथे उल्लेखनीय असे की १९६६मध्ये साहित्याचा नोबेल पुरस्कार विभागून देण्यात आला होता. योगायोग असा की पुरस्कारप्राप्त दुसरे साहित्यिक - कादंबरीकार एस. वाय. ॲग्नॉन - हे ज्यू धर्मीयच होते. नेली झाक्स यांच्या म्हणण्यानुसार (छळाकडून बळाकडे गेलेल्या ज्यूंच्या) स्वतंत्र इस्रायलचे प्रतिनिधित्व जणू ॲग्नॉन करीत होते.

बर्लिन येथे सुखवस्तू, उदारमतवादी आणि सुसंस्कृत घराण्यात जन्म झालेल्या नेली यांचे शिक्षण सुरुवातीच्या काळात घरीच खाजगी शिकवणी लावून झाले. संगीत, नृत्य आणि साहित्य या तीनही विषयांची त्यांना आवड होती. नृत्यात पारंगत होण्याची त्यांची इच्छा होती. वयाच्या पंधराव्या वर्षी सेल्मा लागरलोफ् यांची Gosta Berling ही कादंबरी वाचल्यानंतर सेल्मा लागरलोफ् यांच्याबरोबर सुरू झालेला त्यांचा पत्रव्यवहार सुमारे ३५ वर्षे टिकला. जर्मन साहित्याचे वाचन करीत असतानाच नेली झाक्स यांनी काव्यलेखनास सुरुवात केली होती. १९२१मध्ये त्यांचा एक कथासंग्रह प्रसिद्ध झाला होता. १९२०ते ३० या काळात त्यांचे लिखाण वृत्तपत्रे आणि मासिकांमधून प्रसिद्ध झाले होते. १९३०च्या दशकात ज्यूंच्या सांस्कृतिक संघटनेचे सभासदत्व नेली यांनी स्वीकारले होते. पण तेव्हा बर्लिनच्या साहित्यवर्तुळात त्या सर्वांना फारशा परिचित नव्हत्या. १९३०मध्ये त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला आणि १९३३मध्ये नाझींच्या हाती सत्ता जाऊन ज्यूंच्या हालअपेष्टांना सुरुवात झाली होती. नेली यांचे प्रेमसंबंध एका अन्यधर्मीय व्यक्तीबरोबर जुळले होते. पण या प्रेमाची अखेर सुखी वैवाहिक जीवनात झाली नाही. ज्यूंचा छळ चालू झाला त्याच काळात त्या व्यक्तीचे निधन झाले होते.

स्वीडन येथे राजकीय आश्रय घेतल्यानंतर नेली यांनी तेथे अनुवादाचे काम हाती घेतले. त्यामुळे जर्मन व स्वीडिश या दोन्ही भाषांमधील साहित्याची ओळख वाचकांना झाली.१९५०मध्ये आईचे निधन झाल्यानंतर मानसिक रुग्ण बनलेल्या नेली काही काळ रुग्णालयात भरती झाल्या होत्या. १९६०पर्यंतचे त्यांचे आयुष्य एकाकी व दुःखीच होते. या काळात त्यांचे साहित्यही आकारत होते. त्यामुळेच त्यांच्या साहित्यात दुःख व वेदना आणि त्यांचे एकाकीपण यांचे प्रतिबिंब उमटलेले दिसते.

In den Wohnungen des Todes (इन द हाऊस ऑफ डेथ) हा त्यांचा काव्यसंग्रह १९४७मध्ये प्रसिद्ध झाला. त्यांच्या कविता लयबद्ध होत्या. ज्यूंच्या नशिबातील दुःख व यातना या मध्यवर्ती संकल्पनेभोवतीच या कविता आकारल्या होत्या. Sternverdunkelung (इक्लिप्स ऑफ द स्टार्स-१९४९), Und niemand weiss weiter (अँड नो वन नोज व्हेअर टू गो - १९५७) आणि Filght and Metamorphosis या त्यांच्या काव्यसंग्रहांतूनही हेच वेदनामय जगत पुढे येते. त्यांच्या काही परिचितांनी Eli: A Miracle Play of the Suffering Israel या त्यांच्या नाटकाच्या सुमारे २०० प्रती खाजगी वितरणासाठी म्हणून प्रसिद्ध केल्या होत्या. कोणत्या तरी मार्गाने त्या जर्मनीत पोहचल्या होत्या आणि मग त्याचे प्रसारण रेडिओवरून करण्यात आले होते. नाझींच्या छळछावणीतील मृतांच्या स्मृतिनिमित्त हे नाटक लिहिण्यात आले होते. वरकरणी पाहता मध्ययुगीन काळातील एखादे नाटक असावे तशी काहीशी या नाटकाची कथा/रचना होती. पण, विश्वास आणि चांगुलपणा यांचा अभाव असलेल्या या जगात दुष्ट प्रवृत्तींसमोर निरागसतेचा बळी कसा जातो, याचे चित्रण त्यात प्रामुख्याने होते. याच काळात त्यांनी आणखी ११ नाटके लिहिली होती. या सर्व साहित्यकृतींमुळे आणि Flucht Und Andlung या नावाने १९५९मध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाने जर्मन साहित्याच्या क्षेत्रात त्यांना एकदम मानाचे स्थान मिळाले होते. 'जर्नी टू द बियाँड' हा त्यांच्या निवडक कवितांचा काव्यसंग्रह १९६१मध्ये प्रसिद्ध झाला होता.

नेली यांनी विवाह केलेला नव्हता. पण त्यांच्या कवितांमधून एका प्रेमिकाची प्रतिमा सतत डोकावते. Zeichen Im Sand या काव्यसंग्रहात तारका, वाळू, माती अशी काही रुपके त्यांनी वापरली आहेत. प्रेषित ज्या प्रकारे सामान्यांशी संवाद साधतात त्या प्रकारे वाचकांशी संवाद साधण्याची नेली यांची शैली असल्याचे काही काव्यसंग्रहांतून दिसते. असफल प्रेम आणि ऐन तारुण्यात ऐकलेल्या ज्यूंच्या छळाच्या कहाण्या यांमुळे त्यांच्या कवितांमधून एकाकीपणा व वेदनाच पुढे येतात. पण क्वचित कधी त्यांतून आशावादही डोकावतो. त्यामुळे, छळछावणीतील चिमणीतून बाहेर पडणा-या धुरात त्यांना ज्यूंचे स्वतंत्र राष्ट्रही दिसते.



१९६०च्या दशकात त्यांना स्वीडन व जर्मनी या दोन्ही देशांकडून पुरस्कार मिळाले होते. तेव्हा सुमारे २०-२५वर्षांनी त्यांनी जर्मनीला भेट दिली होती. त्या वेळी केलेल्या भाषणात त्यांनी ''माझ्या मनातील वेदना शब्दांमध्ये प्रकट झाल्या असल्या तरी माझा तुमच्यावर (जर्मन नागरिकांवर) विश्वास आहे'', अशी भावना व्यक्त केली होती. उल्लेखनीय बाब म्हणजे, जर्मनीतील City of Dortmund ने त्यांच्याच नावाचा 'नेली झाक्स पुरस्कार' हा जो पुरस्कार साहित्यिकांसाठी सुरू केला होता, त्याच्या एक मानकरी त्या स्वतःच होत्या.

स्वीडनमध्ये असताना पॉल सेलान या कवीबरोबर त्यांचे मैत्रीचे धागे जुळले होते. साहित्य हा या दोघांचा इतका प्राणप्रिय विषय होता की भाषा हा जणू आपल्या अस्तित्वाचा पायाच आहे, यावर त्यांचे एकमत झाले होते. आपल्याला प्रिय असणा-या अनेक बाबी आपल्यापासून दूर होऊ शकतात पण आपली भाषा आपल्यापासून कधीच दूर होऊ शकत नाही, असे नेली म्हणत असत. ज्यूंचा छळ आणि त्यांचे भविष्य हे या दोघांचेही काळजीचे विषय होते आणि या विषयांमुळे त्यांची मैत्री अधिक गहिरी बनली होती. पण त्यांच्या या मैत्रीचा एक परिणाम त्यांच्याही कळत नकळत त्यांच्या विचारविश्वावर व साहित्यावर घडून येत होता. तो म्हणजे त्यांच्या ज्यूंप्रतीच्या सद्भावना/संवेदना त्यांना अधिक काळजी व दुःख यांकडे नेत होत्या. जर्मनीत असताना, काव्यलेखनाच्या सुरुवातीच्या काळात त्यांच्यावर ख्रिस्ती धर्माचा प्रभाव होता. आपले धार्मिक मूळ कोणते हे त्यांच्यालेखी खरे तर फारसे महत्त्वाचे होते असे नाही. पण, समाजातील Anti-Semitism मुळे त्या Orthodox Hasidismकडे आकर्षित झाल्या होत्या. त्यातील काही बाबी या ख्रिस्ती धर्माशी साधर्म्य साधणा-या होत्या.

जर्मनीतील वाचकांना नेली यांचा परिचय झाला होता तरी अन्य युरोपीय देशांमधील तसेच अमेरिकेतील वाचकांना मात्र त्या फारशा परिचित नव्हत्या. १९६६साली त्यांना नोबेल पुरस्कार जाहीर झाला तेव्हाच त्यांचा परिचय अनेकांना झाला. ज्यूंच्या दुःखाला आणि वेदनांना शब्दबद्ध करणा-या नेली यांची लेखणी स्टॉकहोम येथे १२ मे १९७०रोजी थांबली ती कायमचीच. ■■

# साहित्याला जोड चळवळीची



नदाइन गॉर्डायमर (१९२३-)

आपल्या मातृभूमीतील - दक्षिण आफ्रिकेतील - वंशभेदग्रस्त समाजातील मानसिक आणि नैतिक ताणतणाव आपल्या साहित्यकृतींमधून पुढे आणून वंशभेदविरोधी चळवळीला बळ प्राप्त करून देणा-या तसेच प्रत्यक्ष चळवळीत सहभागी होणा-या कादंबरीकार नदाइन गॉर्डायमर (Nadine Gordimer) यांना त्यांच्या मानवतावादी लेखनासाठी १९९१मध्ये साहित्याचा नोबेल पुरस्कार मिळाला होता. त्यांचा जन्म झाला आफ्रिकेतच - १९२३ मध्ये. नवव्या वर्षापासून त्यांचे लेखन चालू झाले आणि आजपर्यंत त्यात खंड पडलेला नाही. त्यांचे वडील ज्यू होते आणि आई ब्रिटिश. त्यामुळे वंशभेदाची झळ नदाइन गॉर्डायमर यांना पोहचली नसली तरी आफ्रिकेतील वंशभेदामुळे त्यांचे संवेदनशील बालमन अस्वस्थ होत होते. भेदभावग्रस्त समाजातील दैनंदिन व्यवहारांतील बारकावे कळत-नकळत त्यांच्या मनावर कोरले जात होते आणि ते शब्दबद्ध होत होते. त्यांच्या १४ कादंब-या आणि ११ लघुकथासंग्रह प्रसिद्ध झाले असून 'आफ्रिकन नॅशनल काँग्रेस'चे नेते नेल्सन मंडेला यांच्या त्या निकटवर्ती आहेत. साहित्य, चळवळ आणि राजकारण असा त्यांचा प्रवास होण्यामागे त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी महत्त्वाची ठरते. चळवळीत कार्य करण्याची प्रेरणा आणि समतावादी दृष्टिकोण त्यांच्या मनात रुजला तो आईकडून. आफ्रिकेतील स्त्रियांची स्थिती लक्षात घेऊन त्यांच्या आईने आफ्रिकीवंशीय बालकांसाठी पाळणाघर चालू केले होते. तर, सामान्य नागरिक असलेल्या पण राजकीय परिस्थितीत अडकलेल्या वडिलांकडून त्यांना राजकारणाचे महत्त्व कळले. 'निर्वासित ज्यू' म्हणून त्यांच्या वडिलांनी लाटविया येथे राजकीय आश्रय घेतला होता.



खेळण्या-बागडण्याच्या वयात नदाइन लेखनाकडे वळल्या त्या आईमुळे. त्यांच्या आईला असे वाटायचे की लहानग्या नदाइन यांची प्रकृती नाजूक आहे, विशेषतः त्यांचे हृदय कमजोर असावे अशी त्यांना शंका होती. त्यामुळे त्यांनी घराबाहेर जास्त वेळ जाऊ नये, खूप खेळून दमू नये, याची काळजी त्या घेत असत. त्यामुळे घरातच अधिक वेळ असणा-या लहानग्या नदाइन रिकामा वेळ घालविण्यासाठी काही ना काही लिहू लागल्या. त्यामुळे बालवयापासूनच त्यांची लेखणी झरझर चालू लागली. Come Again Tomorrow ही त्यांची पहिली कथा जोहान्सबर्ग येथील एका मासिकात प्रसिद्ध झाली होती. विसाव्या वर्षापर्यंत त्यांच्या कथांना अनेक मासिकांमधून प्रसिद्धी मिळाली होती. 'न्यू यॉर्कर' या जगप्रसिद्ध मासिकाने त्यांची एक कथा १९५१मध्ये प्रसिद्ध केली होती. तेव्हापासून त्यांचे साहित्य 'न्यू यॉर्कर'ने अनेक वेळा प्रसिद्ध केले आहे.

Face to Face हा त्यांचा पहिला लघुकथासंग्रह १९४९मध्ये प्रकाशित झाला होता. वंशभेदग्रस्त समाजातील नागरिकांवर होणारे मानसिक परिणाम या कथांमधून पुढे येतात. The Lying Days या १९५३मध्ये प्रकाशित झालेल्या पहिल्या कादंबरीतून गावातील दैनंदिन जीवनव्यवहारात होणा-या संकुचित मनोवृत्तीचे दर्शन घडते. अशा घटनांमुळे अस्वस्थ होणा-या गौरवर्णीय हेलेनची (लेखिकेच्या स्वानुभवांवर आधारित असलेली) ही कथा आहे. A World of Strangers, Occasion for Loving, The Late Bourgeois World या त्यांच्या कादंब-यांमधून, त्या काळातील साम्राज्यवादाचा एक विपरीत परिणाम म्हणून निर्माण होणारा भयगंड, गौरवर्णियांचा खुजा/खोटा उदारमतवाद मालक-नोकर संबंध इत्यादी बाबींवर प्रकाश पडतो. Occasion for Loving ही कादंबरी स्त्री-पुरुषांमधील अनैतिक संबंधांवर आधारित होती आणि त्यातून त्या काळी असलेल्या वंशभेदविषयक क्रूर कायद्याचा विषय मांडण्यात आला होता. The Conservationist या कादंबरीत गौरवर्णीय उद्योगपतीचे विश्व आणि झुलू लोकांच्या पुराणकथा, चालीरीती यांची चर्चा होती. तर Burgers Daughterमध्ये आफ्रिकेतील Soweto यांचा उठाव शब्दबद्ध करण्यात आला होता. यातील कथानायिका ही एका हुतात्म्याची कन्या असून त्यांच्यातील संवेदनशील व भावूक नात्याचे चित्रण यात आहे.

भविष्याचा वेध घेणारी July's People ही कादंबरी म्हणजे जोहान्सबर्ग या युद्धग्रस्त भागांतून अन्यत्र स्थलांतर करणा-या गौरवर्णीय कुटुंबाची कहाणी आहे. त्यांच्याकडे कामाला असलेला त्यांचा नोकर आपल्या गावात त्यांना कसा आश्रय मिळवून देतो याची की कथा होय. Six Feet of the Country, Not for Publication, Livingsone's Companions हे त्यांचे काही लघुकथासंग्रह. वंशभेदाची पार्श्वभूमी हा त्यांच्या या साहित्याचा समान धागा. A Soldier's Embrace या १९८०साली प्रकाशित झालेल्या कादंबरीत, खेड्यातील प्रमुख, शोषितांची बाजू घेतो आणि संघर्षात खेडे नष्ट होते तेव्हा तो आत्महत्येचा मार्ग पत्करतो, असे दर्शविण्यात आले आहे. झिम्बाब्वेच्या स्वातंत्र्यलढ्याची पार्श्वभूमी उपरोक्त कादंबरीला होती. जीवन आणि मृत्यू यांचे प्रतीक म्हणून mopaneच्या झाडाचा उल्लेख या कादंबरीत आहे. खेड्यातील प्रमुख याच झाडापाशी आपली जीवनयात्रा संपवितो. साम्राज्यवादी धोरणांच्या पार्श्वभूमीवर घडणा-या दुःखद घटनांचा संबंध लक्षात घेऊ न आपल्या कादंबरीतील वा कथेतील मुख्य पात्रांच्या कृतींचे बारकाईने परीक्षण करणे हा त्यांच्या लिखाणातील एक महत्त्वाचा पैलू होता. त्यांच्या The Conservationist या कादंबरीने बुकर पुरस्काराचा मान मिळविला होता. 'व्यामिश्र पण काव्यमय कादंबरी' या शब्दांत या कादंबरीचे वर्णन केले गेले. The Pickup ही त्यांची २००१मधील कादंबरी असून त्यातून नवीन आव्हाने स्वीकारण्याचा संदेश मिळतो.

आपल्या साहित्यातून सातत्याने वर्णभेदाविरुद्ध आवाज उठविणा-या नदाइन यांच्या काही कादंब-यांवर दक्षिण आफ्रिकेत काही काळ बंदी घालण्यात आली होती. त्यांपैकी A World of Strangers या कादंबरीवर सर्वांत अधिक काळ म्हणजे बारा वर्षे बंदी घालण्यात आली होती. पण अभिव्यक्तीस्वातंत्र्य महत्त्वाचे मानणा-या नदाइन यांनी दक्षिण आफ्रिका या आपल्या मातृभूमीचा त्याग मात्र कधी केला नाही. शिक्षणासाठी त्या काही काळ अमेरिकेत होत्या. तसेच अमेरिकेतील काही विद्यापीठांमधून त्यांनी अध्यापनाचे कार्यही केले होते. अमेरिका, बेल्जियम, ऑक्सफर्ड, केंब्रिज इत्यादी विद्यापीठांच्या मानद पदव्यांच्या त्या मानकरी आहेत. त्यांचे सामाजिक व राजकीय कार्यही महत्त्वाचे आहे.



अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा मुद्दा त्यांच्यालेखी महत्त्वाचा असल्याने लेखक-साहित्यिकांनी एकत्र यावे यासाठीही त्यांनी प्रयत्न केले. 'काँग्रेस ऑफ साउथ आफ्रिकन रायटर्स'च्या त्या संस्थापक सदस्य होत्या. जगभरातील साहित्यिकांची आपापसातील बौद्धिक चर्चा व सहकार्य वाढावे यासाठी असलेल्या International PEN या संघटनेच्या त्या उपाध्यक्ष होत्या. (स्त्री-पुरु ष समतावादी असल्याने) फक्त लेखिकांसाठी असलेल्या 'ऑरेंज अवॉर्ड'साठी उमेदवारी अर्ज करण्यास त्यांनी नकार दिला होता. दक्षिण आफ्रिकेतील सरकारच्या, अभिव्यक्ती-स्वातंत्र्यास नुकसानकारक असलेल्या अगदी अलीकडील धोरणाविरु द्धही त्यांनी आवाज उठविला आहे.

नोबेल पुरस्कार प्राप्त थोर भारतीय साहित्यिक रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्याशी नदाइन परिचित आहेत. दोन वर्षांपूर्वी - २००८ मध्ये-कोलकाता येथे त्यांचे एक भाषण आयोजित करण्यात आले होते. त्या वेळी दिलेल्या एका मुलाखतीदरम्यान त्यांनी रवींद्रनाथ टागोर, नयनतारा सहगल, आर. के. नारायणन, सलमान रश्दी आणि अरविंद अडिगा यांचे साहित्य आपण वाचले असल्याचे सांगितले होते.

नदाइन गॉर्डायमर या केवळ वंशभेदावर लिखाण करू न थांबल्या नाहीत तर आपल्या विचारांना त्यांनी कृतीची जोड दिली. 'आफ्रिकन नॅशनल काँग्रेस'च्या नदाइन या सदस्य आहेत. या संघटनेचे अध्यक्ष व लढ्यातील अग्रणी नेते नेल्सन मंडेला यांची तुरुं गातून सुटका झाली तेव्हा नेल्सन मंडेला सर्वप्रथम ज्या मोजक्या लोकांना भेटले त्यात नदाइन यांचा समावेश होता. संघटनेच्या लोकांना भूमिगत राहण्यासाठी नदाइन यांच्या घराचे दरवाजे कायम उघडे होते. वंशभेदविरोधी चळवळीतील २२ कार्यकर्त्यांच्या वतीने Delmas Treason Trial (१९८६) संदर्भात त्यांनी जबाब नोंदविला तो त्यांच्या आयुष्यातील सर्वांत अभिमानाचा दिवस असल्याचे त्यांना वाटते. अमेरिकेच्या अध्यक्षपदी झालेली बराक ओबामा यांची निवड ही जणू वंशभेदाच्या अंताकडे वाटचाल होय, असे त्यांनी म्हटले होते. बालपणापासून वंशभेदाविरु द्ध लेखणीने लढा देणा-या नदाइन गॉर्डायमर आज जोहान्सबर्ग येथे वास्तव्यास असून वयाच्या ८७ व्या वर्षीही तेवढ्याच उत्साहाने कार्यरत आहेत. ■■

# वारसा आफ्रिकी-अमेरिकींचा


टोनी मॉरिसन (१९३१-)

पुरुषप्रधान आणि वंशभेदग्रस्त समाजातील स्त्रियांचे अनुभव मांडणा-या टोनी मॉरिसन यांना साहित्याचे नोबेल मिळाले १९९३मध्ये. स्वानुभवाचे प्रतिबिंब साहित्यात पडल्याने त्यांच्या कथा-कादंब-यांचा गाभा हा त्यांच्या संस्कृतीशी - आफ्रिकी-अमेरिकी संस्कृतीशी - संबंधित असणे स्वाभाविकच ठरते. आफ्रिकीवंशीय मातापित्यांच्या पोटी जन्मलेल्या चार अपत्यांपैकी दुस-या क्रमांकाच्या असलेल्या टोनी यांचे मूळ नाव Chloe Anthony Wofford. १९३१मध्ये ओहायो येथे त्यांचा जन्म झाला. आफ्रिकीवंशीयांप्रमाणेच अन्य देशांमधीलही बरीच स्थलांतरित कुटुंबे त्या काळी ओहायो येथे होती. आफ्रिकी संस्कृतीचा वारसा त्यांना आईवडिलांकडून मिळाला आणि अमेरिकी संस्कृतीत त्यांची जडणघडण झाली. १९४९मध्ये वॉशिंग्टन येथील विद्यापीठात त्यांनी इंग्रजी भाषेच्या शिक्षणासाठी प्रवेश घेतला. तेथे अनेकांना Chloe हा उच्चार नीट जमत नसल्याने Chloe यांनी आपले नाव केले 'टोनी'. शिक्षण संपल्यानंतर त्यांनी अध्यापनाचे कार्य केले. अमेरिकास्थित जमैकातील कलाकार हॅरल्ड मॉरिसन यांच्याशी १९५८मध्ये विवाह केल्यानंतर त्या झाल्या टोनी मॉरिसन.

बालपणापासूनच वाचनाची आवड असल्याने अध्यापनाचे कार्य आणि दोन मुलांचे संगोपन या कार्यात व्यग्र असतानाही कवी व लेखकांच्या अनौपचारिक गटात त्या सहभागी झाल्या होत्या. एका आठवड्यातील चर्चेसाठी त्यांनी The Bluest Eye अशी एक कथा लिहिली होती. पुढे त्या कथेचाच विस्तार करून The Bluest Eye या नावाने टोनी मॉरिसन यांची पहिली कादंबरी १९७०मध्ये प्रसिद्ध झाली.



एका छोट्या गावातील आफ्रिकी-अमेरिकी संस्कृतीमधील एका कुटुंबात घडलेल्या या कादंबरीतील सर्व पात्रे आफ्रिकीवंशीयच आहेत. 'आपले डोळे निळे असते तर सर्व काही उत्तम झाले असते,' असे या कादंबरीतील नायिकेला कायम वाटत असते. त्यामुळे रोज देवापाशी ते एकच मागणे ती मागत असते. वंशवर्णभेद खोलवर रुजलेल्या समाजात वावरताना आलेल्या अनुभवांवरूनच असे निळ्या डोळ्यांचे मागणे ओठी यावे, हे चित्र तत्कालीन समाजाची मानसिकता दर्शविते. या कादंबरीमुळे टोनी मॉरिसन यांची लेखिका म्हणून ओळख प्रस्थापित झाली.

१९७३मध्ये प्रकाशित झालेल्या Sula या कादंबरीत ओहायो येथील आफ्रिकीवंशीय मैत्रिणींची कथा गुंफण्यात आली आहे. बालपणापासून मृत्यूपर्यंत अखंड राहिलेल्या मैत्रीचे अनेक पदर अलगद उलगडताना लेखिकेने तत्कालीन समाजाचे चित्रही त्यात रेखाटले आहे. या पुस्तकाला 'नॅशनल बुक क्रिटिक अवॉर्ड' मिळाले होते. Song of Soloman ही त्यांची कादंबरी (१९७७) मात्र वेगळा मार्ग चोखाळते. येथे स्त्रीपात्र प्रमुख नाही तर पुरुष पात्र प्रमुख आहे. पूर्वजांकडून मिळालेले सोने व मालमत्ता परत मिळविण्यासाठी कथानायकाने केलेल्या अथक प्रयत्नांची ही कहाणी आहे. 'बुक ऑफ द मन्थ क्लब'साठी Song of Solomanची निवड झाली होती.

मानाचा समजला जाणारा पुलित्झर पुरस्कार त्यांना मिळवून दिला तो Beloved या १९८७साली प्रसिद्ध झालेल्या कादंबरीने. अमेरिकेत गुलामाचे जिणे नशिबात आलेल्या आफ्रिकीवंशीय स्त्रीची सत्य कहाणी या कादंबरीने पुढे आणली. आपल्याला तर गुलामगिरीतून सुटका करून घेता आली नाही, पण आपले जिणे मुलांच्या नशिबी येऊ नये, गुलामगिरीतून त्यांची कायमची सुटका व्हावी, असे वाटणा-या स्त्रीने - Setheने - आपल्या प्राणप्रिय बाळाची हत्या केल्याच्या सत्य घटनेवर आधारित असलेली ही कादंबरी तत्कालीन समाजाची अतिशय विदारक बाजू पुढे आणते. खरे तर त्या मातेला आपल्या सर्वच मुलांची हत्या करायची असते, पण तिला फक्त नाव न ठेवलेल्या छोट्या बाळाचे जीवन संपविता येते. दफन केलेल्या ठिकाणी बांधलेल्या चबुत-यावर संदेश लिहिण्यासाठी Setheजवळ पैसे नसल्याने तेथे फक्त Beloved हा एकच शब्द कोरण्यात आलेला असतो.

या घटनेनंतर तिच्या मोठ्या मुलीच्या - डेन्वरच्या- मनात भीतीने घर केलेले असते. मृतात्म्याने जणू तिला पछाडले असते. मग Setheला भेटण्यासाठी आलेला एक परिचित त्या मृतात्म्याला तात्पुरते पळवून लावतो. पण मृतात्मा या परिचिताच्या मनावर ताबा मिळवितो, तो हिंसक बनतो. डेन्वर घर सोडून निघून जाते. कारुण्य, भीती, दुःख अशा भावनांनी भरलेल्या या कादंबरीवर आधारित चित्रपटही काढण्यात आला होता. ऑप्रा विन्फ्रे यांनी या चित्रपटात मुख्य भूमिका केली होती.

Jazz ही त्यांची कादंबरी १९९२मध्ये प्रकाशित झाली होती. पत्नीशी प्रतारणा करणारा नवरा भावनेच्या भरात एक हत्या करतो. ही हत्या करण्यामागील त्याची भूमिका आणि त्या घटनेचे परिणाम या कादंबरीतून लेखिकेने उलगडले आहेत. १९९३मध्ये नोबेल पुरस्कार मिळाल्यानंतर १९९८मध्ये त्यांची Paradise ही कादंबरी प्रसिद्ध झाली. एका छोट्या समाजातील स्त्रियांची कहाणी यातून पुढे येते. 'द कॉन्व्हेंट' या नावाने ओळखली जाणारी एक शाळा असते. कालांतराने शाळा बंद पडते. आता तिथे काही स्त्रिया राहात असतात. नव-याकडून होणारा छळ वा प्रियकराने दिलेला धोका वा अन्य कोणत्या तरी प्रकारचा वाईट असा पूर्वेतिहास असणा-या गरजू स्त्रियांचे 'द कॉन्व्हेंट' हे जणू हक्काचे घरच ! पण हे घर सोडून बाहेरच्या जगात पाऊल टाकले की त्यांना जीवाची भीती. न जाणो पूर्वेतिहासातील दुष्ट व्यक्ती आपल्या वाईटावरच टपलेल्या असतील तर.... त्यामुळे 'द कॉन्व्हेंट' हा जणू त्यांच्यासाठी सुरक्षित असा स्वर्गच !

यानंतर २००३मध्ये Love या कादंबरीतून त्यांनी एका हॉटेल व्यावसायिकाची कहाणी शब्दबद्ध केली होती. त्याचे एकूण व्यक्तिमत्व आकर्षक, समोरच्यावर छाप पाडणारे. त्यामुळे त्याच्या मृत्यूनंतरही तो अनेकांच्या आठवणीत असतो. आता त्याच्या मोठ्या हवेलीत त्याची विधवा पत्नी आणि नात यांचे वास्तव्य असते. मानवी जीवनातील अनेकानेक प्रवृत्तींचे दर्शन घडविणारी अनेक पात्रे या कादंबरीतून वाचकाला भेटतात. स्वाभाविकच माणसामाणसांमधील राजकारणही त्यात आहे. या कादंबरीसंदर्भातील एका मुलाखतीत लेखिका स्पष्ट करते की कोणताही कलाकार हा non-political नसतो.



साहित्यात रमणा-या टोनी मॉरिसन यांनी अमेरिकेतील राजकारणासंदर्भातही वेळोवेळी मते मांडली आहेत. २००८साली झालेल्या अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्यांनी बराक ओबामा यांना पाठिंबा दिला होता. लेखनाचे क्षेत्र आव्हानात्मक आहे, असे मानणा-या टोनी मॉरिसन यांना 'पालक असणे' ही भूमिकाही महत्त्वाची व आव्हानात्मक वाटते. या दोन क्षेत्रांशिवाय अन्य क्षेत्रांत त्यांना फारशी रूची वाटली नाही. बालपणापासून भरपूर वाचन करणा-या या लेखिकेचे जेन ऑस्टिन, टॉलस्टॉय, दोस्तोव्हस्की हे आवडते लेखक आहेत.

'रँडम हाऊस' या प्रकाशन संस्थेत संपादकपदी असताना आफ्रिकी-अमेरिकी संस्कृतीला साहित्याच्या क्षेत्रात स्थान मिळवून देण्यात मॉरिसन यांचा पुढाकार होता. अमेरिकेतील आफ्रिकींच्या जीवनातील परिस्थिती त्यांच्या साहित्यातून पुढे आल्याने अमेरिकेच्या समाजजीवनातील वास्तव लोकांपुढे आले. अध्यापनाच्या क्षेत्रात असताना त्यांनी विद्यार्थ्यांसाठी 'क्रिएटिव्ह रायटिंग' हा उपक्रम राबविला. आंतरविद्याशाखीय दृष्टिकोण स्वीकारणा-या व कलेच्या क्षेत्रात नवे आकृतिबंध, नव्या वाटा धुंडाळणा-या अन्य क्षेत्रांतील कलाकारांनाही त्यांनी प्रोत्साहन दिले होते. मॉरिसन यांनी आपल्या मुलाबरोबर सहलेखिका म्हणून काम केले. त्या दोघांनी मिळून बालसाहित्यही लिहिले. 'टोनी मॉरिसन' याच नावाने त्या साहित्याच्या क्षेत्रात प्रसिद्ध झाल्या असल्या तरी मूळचे Chloe हे नाव बदलून 'टोनी' हे नाव स्वीकारण्याचा आपला निर्णय त्यांना १९९२मध्ये चुकीचा वाटला होता. आफ्रिकी-अमेरिकी स्त्रियांच्या संदर्भात त्यांनी अधिक लिखाण केले असले तरी, आपले लिखाण स्त्रीवादी नाही, असे त्या स्पष्ट करतात. पितृसत्ताक वा मातृसत्ताक अशा दोन्ही पद्धती त्यांना मान्य नाहीत. सर्व बाबींसंदर्भात समता असणे त्यांना गरजेचे वाटते.

१९७७ते २००० या काळात साहित्याशी संबंधित १५ पुरस्कार मिळालेल्या टोनी मॉरिसन यांची ओळख आफ्रिकी-अमेरिकी नागरिकांमध्ये नोबेल पुरस्कार मिळविणा-या पहिल्याच लेखिका अशी बनली आहे. विविध क्षेत्रांत उत्तम कार्य करणा-या पहिल्या शंभर आफ्रिकी-अमेरिकी नागरिकांच्या यादीत टोनी मॉरिसन यांचे नाव झळकले आहे. ■■

# काव्य जगणारी कवयित्री



विझ्लावा झिर्म्बोस्का (१९२३-)

रेल्वेस्टेशनच्या नजीक एका छोट्या घरात राहात असल्याने रेल्वेगाड्यांचा लयबद्ध खडखडाट ऐकत मोठ्या झालेल्या विझ्लावा झिर्म्बोस्का (Wislawa Szymborska) यांना जीवनाची लय सापडली ती काव्यात. पोलंडच्या पश्चिमेकडील भागात असलेल्या Kornik येथे १९२३मध्ये त्यांचा जन्म झाला. पोलिश साहित्य आणि समाजशास्त्र हे त्यांचे अभ्यासाचे विषय होते. १९४५ मध्ये त्यांची पहिली कविता प्रसिद्ध झाली ती स्थानिक वृत्तपत्रातून. या नंतर त्यांचे काव्यलेखन उत्तरोत्तर बहरतच गेले. दरम्यान, १९५३ ते १९८१ या काळात त्यांनी काव्यविषयक मासिकात संपादनाचे कार्य केले. त्यांचे १६ काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. काही फ्रेंच कवितांचा अनुवाद त्यांनी पोलिश भाषेत केला आहे. कवयित्री विझ्लावा झिर्म्बोस्का यांना १९९६ मध्ये, वयाच्या ७३व्या वर्षी, साहित्याचा नोबेल पुरस्कार मिळाला. इंग्लिश, जर्मन, स्वीडिश, इटालियन, डॅनिश, हिब्रू, हंगेरियन, चेक, स्लोवाकियन, सर्बो-क्रोएशियन, रुमानियन, बल्गेरियन इत्यादी भाषांमधून त्यांच्या अनेक कवितांची भाषांतरे झालेली आहेत. गंमत म्हणजे भरपूर कविता करणा-या या कवयित्री कविता या विषयावर, तसेच, स्वतःबद्दल बोलणे टाळतात. अगदी नोबेल पुरस्कार मिळाल्यानंतरही त्यांनी माध्यमांसमोर जाण्याचे टाळले होते. "I am a private person" हे त्यांचे वाक्य होते. नोबेल पुरस्कार मिळण्याआधी १९९१मध्ये Goethe Prize आणि १९९५मध्ये Herder Prize हे पुरस्कार त्यांन मिळाले होते. पोलंडमधील Poznam विद्यापीठाच्या सन्माननीय डी. लिट. पदवीच्याही त्या मानकरी (१९९५) आहेत. १९९६मध्ये Polish PEN Club तर्फेही त्यांना गौरविण्यात आले होते.



काव्यलेखनाच्या सुरुवातीच्या काळात त्यांच्या कवितांवर साम्यवाद/समाजवादाची छाया होती. काही काळ त्या साम्यवादी राजकारणाशीही संबंधित होत्या. नंतर मात्र त्यांचे विचार बदलले आणि साम्यवादापासून त्या दूर गेल्या. तत्कालीन सोव्हिएत रशियातील १९८०च्या दशकातील बदलती परिस्थिती लक्षात घेऊन साम्यवादविरोधी चळवळीत त्या सहभागी झाल्या होत्या. असे असले तरी त्यांच्या सर्वच कविता राजकीय नाहीत. सामान्य व्यक्तींच्या दैनंदिन जीवनांतील घटनांमधून पुढे येणा-या सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्नही त्यांनी कवितांद्वारे केला. त्यामुळे व्यक्ती आणि त्यांचे जीवन हे विझ्लावा झिर्म्बोस्का यांचे कविता-विषय ठरतात. विस्लावा झिर्म्बोस्का यांच्या कविता सुलभ आणि रंजक आहेत. एकाच भाषेतील त्यांच्या कवितांचे अनेक भाषांमध्ये अनुवाद करणे शक्य झाले यावरून त्यांच्या काव्य-विचारांना भाषेची मर्यादा आलेली नाही, असे दिसून येते.

त्याचप्रमाणे त्यांच्या कवितांमध्ये तत्कालीन पूर्व युरोपीय देशांतील नागरिकांच्या मनाचा ठाव घेण्याचे सामर्थ्य असावे, असेही म्हणण्यास जागा आहे. विझ्लावा झिर्म्बोस्का यांच्या कविता पोलिश भाषेत आहेत. साहजिकच पोलंडमधील समाजजीवनाचे संदर्भ त्यांच्या काव्यात डोकावतात. पूर्व युरोपमधील पोलंडसह अनेक देश तत्कालीन सोव्हिएत रशियाचा एक भाग असल्याने आणि त्या देशांमधील सामाजिक, आर्थिक, राजकीय बाबींमध्ये बरेचसे साधर्म्य असल्याने त्यांच्या कविता देशोदेशींमधील नागरिकांच्या मनाला भिडल्या. त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यातील काही छोट्याशा घटना वा प्रसंग यांचे दर्शन कधी त्यांच्या काव्याद्वारे होते. पण त्यांच्या काव्याचा सूर आत्मचरित्रात्मक नाही.

पोलंडच्या सीमा ओलांडून त्यांच्या कविता पूर्व युरोपीय देशांमध्ये पोहचल्या त्याप्रमाणेच 'पूर्व युरोप' हे बंधनही ओलांडून त्यांच्या कविता अमेरिकी मनालाही भावल्या आहेत. 'न्यू यॉर्क रिव्ह्यू ऑफ बुक्स'मधील एका लेखात असे म्हणण्यात आले होते की, शब्दलाघवातून व्यक्त होणारे चातुर्य, विनोदबुद्धी, ज्ञान आणि भावनेचा ओलावा असणारा उबदारपणा यांचा मिलाफ त्यांच्या ठायी झाला असल्याने त्यांचे व्यक्तिमत्व जसे असाधारण होते त्याप्रमाणे त्यांच्या कविताही अविस्मरणीय ठरल्या आहेत.

देशकालपरिस्थितीचा विचार करणाऱ्या विझ्लावा यांच्या कविता विचारी मनाला भावणाऱ्या असल्या तरी त्यासाठी सतत गंभीर काव्यच पुढे आले पाहिजे असे नाही, हे त्यांच्या कवितांमधून सूचित होते. त्यांच्या व्यक्तिमत्वात असलेले चातुर्य व विनोदबुद्धी त्यांच्या काव्यातून प्रकट होते. त्यांच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम झाला तेव्हा त्यांच्या व्यक्तिमत्वातील हा पैलू वयाच्या ऐंशीव्या वर्षीही टिकून असल्याचे आढळले. काव्य जगणारी कवयित्री असे त्यांना म्हणता येईल. विनम्र स्वभाव असलेल्या विझ्लावा या प्रसिद्धीच्या झोतापासून दूर राहणेच पसंत करतात. कॅमेऱ्यासमोर आल्यास जणू आपला कवीहृदयी आत्माच हिरावला जाईल की काय अशी काहीशी भावना मनी बाळगून कॅमेऱ्यासमोर येणेही त्या टाळतात. Greta Garbo of Poetry असे त्यांना आदराने व कौतुकाने म्हटले जाते.

त्यांच्या सर्व कवितांचे भाषांतर इंग्लिश भाषेमधून न झाल्याने इंग्लिश भाषा जाणणाऱ्या जागतिक वाचकाला त्यांचा अद्याप पूर्ण परिचय होऊ शकलेला नाही. अनेकांना त्यांच्या कविता कधी साध्या-सोप्या वाटतात तर त्याच वेळी त्यांना त्यामधून काही गूढताही जाणवते, त्यामुळे त्यांच्या कविता पुनःपुन्हा वाचल्या जातात. विश्वाचे अखंड चालू असलेले जीवनचक्र ही जणू 'वैश्विक पार्टी'च आहे असे त्यांना वाटते. मानवाचे जीवन म्हणजे जणू काही काळासाठी मंचावर आलेला 'पार्टी'तील एक पाहुणा, असे त्यांना वाटते.

११ सप्टेंबर २००१ रोजी दहशतवाद्यांनी अमेरिकेवर केलेल्या हल्ल्यामुळे विझ्लावा अस्वस्थ होतात. त्या दुर्दैवी घटनेची छायाचित्रे पाहून त्यावरही त्या कविता करतात. पण त्यात कुठेही दहशतवादाचा उल्लेख करीत नाहीत. मात्र त्यांच्या कल्पनेत त्या उंच इमारतींवरून पडणाऱ्या सर्व माणसांचा जीव वाचवितात. पुढे काय घडणार हे त्यांना व वाचकांनाही न सांगता. माणसांमधील वाईट प्रवृत्तींवर टीका करण्यापेक्षा मानवी जीवन अनमोल असून माणसांचे जीव वाचणे हे सर्वांत महत्त्वाचे, हा संदेश त्यांना या कवितेतून द्यायचा असेल का? मानवी जीवनातील सहृदयतेला हाक देणाऱ्या या कवितेतून त्यांना फक्त मानवतावादच पुढे आणावा असे वाटले असेल का? ■■




*(पृष्ठ ४वरून)*

बुद्धी, भावना आणि भाषा यांचा सुरेख संगम साहित्यात होत असतो. हा संगम समाजासाठी प्रेरक, उद्बोधक, रंजक ठरतो. मानवी भावभावनांना तर साहित्यात महत्त्वाचे स्थान आहे. 'नाहीच कुणी रे अपुले, प्राणांवर धरणारे, दिक्काल धुक्याच्या वेळी हृदयाला स्पंदविणारे' अशी माणसाची अवस्था होते तेव्हा साहित्य मनाला उभारी देते, मनात चैतन्य निर्माण करते. वेदनेला वाचा फोडणाऱ्या, समाजातील दुःखांना बोलके करणाऱ्या कविता, लेख, कादंबऱ्या हृदयाला भिडतात. असे साहित्य म्हणजे जणू माणुसकीचे शब्दशिल्पच ! समाजमनाची उत्कट जिवंत स्पंदने साहित्यातून जाणवत असतात आणि अशा साहित्यातून प्रगल्भ होण्याच्या दिशेने समाज वाटचाल करू शकतो. उच्च दर्जाचे साहित्य मानवी मनाचा विकास घडवून आणते आणि त्यातून मानवाला जीवनाचा अर्थ उलगडतो. मानवाचे जीवन अधिक अर्थपूर्ण बनते.

व्यक्तिजीवनाला व समाजजीवनाला अशी अर्थपूर्णता देणारे साहित्य विविध भाषांमधून देशोदेशी निर्माण झाले आहे/होते आहे. अशा साहित्याचा, त्याची निर्मिती करणाऱ्या व्यक्तिमत्वाचा परिचय करून घ्यावा, या उद्देशाने 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात साहित्याचा नोबेल पुरस्कार मिळविणाऱ्या स्त्री लेखिका असा विषय निवडण्यात आला आहे. साहित्याचा नोबेल पुरस्कार आतापर्यंत एकूण १२ स्त्री लेखिकांनी मिळविला असून १२ लेखांमधून हा विषय आपल्यासमोर मांडण्यात आला आहे. अर्थात 'अर्थबोधपत्रिके'च्या मर्यादित पानांमध्ये सर्वच लेखिकांच्या संपूर्ण व्यक्तिमत्वाचा व त्यांच्या साहित्याचा सखोल परिचय करून घेणे शक्य नाही, या वास्तवाचे भान राखणेही आवश्यकच आहे. नोबेल पुरस्कार मिळालेल्या परदेशांतील लेखिकांच्या विचारविश्वाची ओळख या निमित्ताने करून घेण्याचा हा एक प्रयत्न आहे. लेखिकांचे साहित्य विविध भाषांमधून असल्याने त्या भाषेतील काही ग्रंथांची मूळ भाषेतील नावे तशीच ठेवण्यात आली आहेत. ज्या साहित्याचे इंग्रजीत भाषांतर झाले आहे त्याचा उल्लेख इंग्रजीत करण्यात आला आहे. या साहित्यिक फराळाचा आस्वाद घेणे आपल्याला आनंददायक वाटेल अशी आशा आहे. ■■

# पापुद्र्यापलीकडचे पाहू शकणारी....


एल्फ्रिद ह्येलिनिक (१९४६-)

रूढ समज, धारणा, प्रतिमा यांना हादरा देणे हा एल्फ्रिद ह्येलिनिक (Elfriede Jelinek) यांचा जणू स्थायीभावच होय. साहित्यातील लक्षणीय योगदानाबद्दल २००४ सालचा नोबेल पुरस्कार जाहीर होईपर्यंत एल्फ्रिद यांचे नाव जगाच्या जर्मन भाषक पट्ट्याच्या बाहेर कोणाला माहितही नव्हते. ही ऑस्ट्रियन कादंबरीकार, कवयित्री आणि नाटककार जगाला ज्ञात झाली ती नोबेलविजेती म्हणूनच. ऑस्ट्रिया ही जन्मभूमी असणाऱ्या एल्फ्रिद यांचे बालपण सरले ते व्हिएन्नामध्ये. तसे बघितले तर एल्फ्रिद यांचे बालपण त्यांच्या वयाच्या इतर मुलांसारखे खेळण्या-बाग़डण्यात, गंमतीत व्यतीत झाले असावे, असे वाटत तरी नाही. एकतर, आईवडिलांची ही एकुलती एक मुलगी. त्यातही पुन्हा आईवडिलांना त्यांच्या लग्नानंतर बऱ्याच वर्षांनी, प्रौढ वयात झालेली. लहानपणापासूनच कविता करण्याचा छंद असलेल्या एल्फ्रिद यांना कॅथलिक कॉन्व्हेंटमधील अति कडक शिस्तीचे, अतिरिक्त नियामक चौकटीतील शिक्षण काही फारसे रुचले नाही. आपल्या मुलीने संगीताच्या क्षेत्रातच नाव कमवावे, अशी एल्फ्रिद यांच्या आईची मनीषा होती. त्यानुसार, वयाच्या १४ व्या वर्षापासूनच एल्फ्रिद यांचे वाद्यशिक्षण सुरूझाले. ऑर्गन, पियानो, गिटार, व्हायोलिन ही वाद्ये एल्फ्रिद सफाईने वाजवत असत. वयाच्या विशीत प्रवेशत असतानाच एल्फ्रिद यांच्या व़डिलांचे निधन झाले. ते वर्ष होते १९६९. मृत्यूच्या आधी काही दिवस त्यांना मनोरुग्णांच्या दवाखान्यात दाखल केले होते. एल्फ्रिद यांचे त्यांच्या आईबरोबरचे संबंध कधीच फारसे सौहार्दाचे नव्हते. नोबेल पारितोषिक मिळण्याच्या आधी चारच वर्षे, म्हणजेच, २००० साली एल्फ्रिद यांच्या आईही निवर्तल्या.



शालेय शिक्षणानंतर एल्फ्रिद यांनी व्हिएन्ना विद्यापीठात रंगभूमी तसेच कलेच्या इतिहासाचे शिक्षण काही काळ घेतले. परंतु, मानसिक दौर्बल्याचा आघात झाल्याने त्यांनी शिक्षण अर्धवटच सोडले. १९६७ सालापासून मात्र एल्फ्रिद यांनी स्वतःला पूर्णवेळ लेखनालाच वाहून घेतले. ऑस्ट्रियन साहित्याच्या परंपरेत एल्फ्रिद यांच्या लेखनाची मुळे सुदूर रुजलेली आहेत, असे काही समीक्षकांचे निरीक्षण सांगते. एल्फ्रिद यांच्या सुरुवातीच्या लेखनकृतींवर अभिव्यक्तिवादाचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो, असेही अभ्यासकांचे प्रतिपादन सांगते. १९ व्या शतकातील यथार्थवादी चित्रकलेची प्रतिक्रिया म्हणून अभिव्यक्तिवादी चित्रकलेची जी चळवळ जर्मनीतील चित्रकारांनी सुरू केली तिचे पडसाद साहित्यातही उमटले. भवतालच्या जगाचे केवळ वास्तववादी चित्रण इथे अभिप्रेत नाही. तर, तो भवताल टिपणाऱ्या कलावंताच्या भावनिक अवस्थेचे दर्शन घडविण्यासाठी वास्तवाचेदेखील विरुपीकरण अभिव्यक्तिवादी साहित्यकृतीमध्ये साकारते. एल्फ्रिद यांची गणना स्त्रीवादी साहित्यकारांमध्ये केली जाते ती त्यांच्या साहित्यात उमटणाऱ्या स्त्रीजीवनाच्या प्रतिबिंबामुळेच. स्त्रीवर वर्चस्व प्रस्थापित करण्याची प्रवृत्ती आणि स्त्रीची शरण्यवृत्ती यांचा संघर्ष जगात पदोपदी दृग्गोचर होत असतो. अगदी मुळाशी जाऊन पाहिले तर, स्त्रीला गौण लेखण्याची मानसिकता समाजातील सत्तासंबंधांची उतरंड, नियंत्रण गाजविण्याची हौस आणि वर्गीय समाजरचनेतील लबाड हातचलाखीच अधोरेखित करते, असे निःसंदिग्ध विश्लेषण एल्फ्रिद मांडतात.

एल्फ्रिद यांच्या साहित्यविश्वासंदर्भातील अंतर्दृष्टी प्राप्त होण्यासाठी एल्फ्रिद यांची राजकीय भूमिका, त्यांचा स्त्रीवादी पवित्रा आणि कम्युनिस्ट पक्षाशी असलेले त्यांचे अनुबंध यांचा परिचय असणे उपयुक्त ठरते. १९७४ ते १९९१ या काळात एल्फ्रिद या ऑस्ट्रियातील कम्युनिस्ट पक्षाच्या सदस्या होत्या. ऑस्ट्रियातील अति उजव्या मतांच्या पक्षाशी कडवा संघर्ष छेडण्यात आघाडीवर असल्यामुळे १९९०च्या दशकात एल्फ्रिद यांचे नाव ऑस्ट्रियातील घराघरांत पोहोचले होते. मात्र, १९९९ सालच्या निवडणुकांनंतर डाव्या आणि उजव्या विचारांच्या पक्षांचे आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर त्याही सरकारच्या कडव्या विरोधकांत एल्फ्रिद यांची गणना होऊ लागली.

व्यवसायाने औषध विक्रेते असणारे एल्फ्रिद यांचे वडील जन्माने मिश्रवंशीय ज्यू होते. एका विलक्षण संवेदनशील उत्पादनांच्या कारखान्यात नोकरी करीत असल्यामुळेच दुस-या महायुद्धापूर्वीच्या छळवादापासून त्यांची सुटका होऊ शकली. परंतु, त्यांच्या कुटुंबातील अन्य सदस्यांच्या भाळी मात्र तो योग नव्हता. एल्फ्रिद यांच्या कुटुंबातील अनेकांचा नाझी छळवादात अंत घडून आला. या सगळ्याचा परिणाम म्हणूनच की काय एल्फ्रिद यांच्या वडिलांना मनोरुग्णांच्या दवाखान्यात अखेरीस दाखल करावे लागले. या सगळ्याच घटनाक्रमांच्या मुशीत एल्फ्रिद यांची तरल साहित्यिक संवेदनशीलता आकार घेत होती. त्यामुळेच असेल कदाचित पण; मानवी नातेसंबंधांच्या पापुद्र्यांपलीकडे असणारी सत्तासंबंधांची उतरंड, मानवी संबंधांच्या विशाल व्यवस्थेमध्ये विविध स्तरांवर नानाविध रूप-स्वरूपांत उद्भवणारी हिंसा, दमनशक्तींचे व्यक्ताव्यक्त दर्शन, विशेषतः स्त्रियांच्या वाट्याला येणारे क्रौर्य, त्या क्रूरतेला असणारे लैंगिक शोषणाचे अस्तर अशा सगळ्या व्यामिश्रतांपर्यंत थेट भिडण्याची, त्यांतील प्रचंड गुंतागुंतीच्या ताण्याबाण्यांची चिकित्सा करण्याची आगळीच प्रतिभा एल्फ्रिद यांच्या ठायी विकसित झाली.

एल्फ्रिद यांचे सगळेच साहित्य म्हणजे या विराट जाळ्याचे शब्दचित्र जणू. ऑस्ट्रियन समाजव्यवस्थेत नांदणारी पुरुषप्रधानता, हुकुमशाही प्रवृत्ती, लैंगिक विकृती हे एल्फ्रिद यांच्या समग्र साहित्यातील काही मुख्य बीजविषय. मानवी आंतरसंबंध - मग ते वैयक्तिक असोत अथवा सामाजिक वा कौटुंबिक - हे आपल्या एकंदरच व्यवस्थेत ठायी ठायी दृढमूल झालेल्या सत्तासंबंधांचेच प्रकटीकरण असते, अशी धारणा एल्फ्रिद यांच्या एकंदरच साहित्यविश्वाच्या मुळाशी दिसते. सत्ता संपादन, आक्रमण, दमन, स्वामित्व गाजविण्याची अनावर भूक याच कोणत्याही प्रकारचे नातेसंबंध जपण्या-जोपासण्यामागील मूलभूत प्रेरणा असतात, ही एल्फ्रिद यांची केंद्रवर्ती लेखनदृष्टी असल्याचे जाणवते. मानवी व्यवहार, त्या व्यवहारांमधून साकारणारे परस्परसंबंधांचे एक विशाल विश्व ही स्वरूपतः सत्तासंबंधांचीच एक व्यापक व्यवस्था असते, ही भूमिका एल्फ्रिद यांच्या लेखनात अनेक ठिकाणी विविध प्रकारे व्यक्त होते.



पिळवणूक, हिंसा, आपल्यापेक्षा दुर्बळ असणा-यांना अंकित करून ठेवण्याची ऊर्मी यांसारख्या सगळ्या वृत्ती-प्रवृत्ती मग अशा त्या व्यवस्थेत अध्याहृतच असतात, जीवनाचे कोणतेही अंग त्यापासून मुक्त राहत नाही, राहू शकत नाही या वास्तवाकडे रोखठोक नजरेने पाहण्यास भाग पाडणे हाच जणू एल्फ्रिद यांच्या लेखनव्यवहाराचा प्रधान हेतू ठरतो. मानवी नातेसंबंधांच्या अशा मती चक्रावून टाकणा-या वास्तवाचे एल्फ्रिद यांनी रेखाटलेले चित्र काही ठिकाणच्या भडक शब्दयोजनेपायी प्रसंगी बीभत्सतेच्या पातळीवर उतरते अशी त्यांच्या लेखनावर काही कोप-यांतून टीकाही झाली. त्यामुळेच, बहुआयामी असणारे त्यांचे साहित्य वादग्रस्तही ठरत आले. अर्थात, त्यांच्या लेखनाचे चाहतेही कमी नाहीत. परंतु, एकंदरीनेच हार आणि प्रहार यांचे आलटून पालटून धनी होण्याचे भागधेय एल्फ्रिद यांना लाभले आहे.

व्यक्तिमत्त्वाला व्यापून राहिलेली एक प्रकारची चिंताग्रस्तता हा एल्फ्रिद यांच्या आयुष्याचा एक अ-साधारण पैलू होय. हा एक प्रकारचा मानसिक दौर्बल्याचाच प्रकार. समाजामध्ये मिसळण्यापासून एल्फ्रिद यांना आजवर त्यांच्या अंतर्मनातील ही चिंताग्रस्तताच रोखत आलेली आहे. आपले हे मानसिक अनारोग्य एल्फ्रिद यांनी कधी दडवलेही नाही. चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहण्याचा आनंद इतर चारचौघांसारखाच लुटावा असे वाटले तरी तसे करण्याचे धाडस आपल्याला या आपल्या वैगुण्यापायीच होत नाही, असे खुद्द एल्फ्रिद यांनीच नमूद करून ठेवलेले आहे. कोणत्याही प्रकारच्या समारंभात सहभागी होणे त्यापायीच आपल्याला जमत नाही, अशी कबुलीही त्या देतात. याच मानसिक दौर्बल्यापायी विमानप्रवासाचे धैर्यही त्यांना होत नाही. परंतु, डोळे कायमचे मिटण्यापूर्वी, एकदा का होईना पण, न्यूयॉर्कमधील गगनचुंबी इमारती निरखण्याची आपली तीव्र मनीषा असल्याचे एल्फ्रिद यांनी एके ठिकाणी नोंदवून ठेवलेले आहे. सामाजिक भयगंडाची ही भावना मनोभूमीत सखोल रुजलेली असल्यामुळेच, बहुमानाचा नोबेल पुरस्कार स्वीकारण्यासाठीही एल्फ्रिद स्वतः स्वीडन येथील समारंभास उपस्थित राहू शकल्या नाहीत. ■■

# वस्तुनिष्ठ आणि स्पष्टवक्ती


डोरिस लेसिंग (१९१९-)

'स्त्रियांमध्ये मातृत्वाची भावना फार प्रबळ असते म्हणून त्या माता बनतात किंवा स्त्रिया फार दयाळू व प्रेमळ असतात असे नाही, तर अनेकदा (गर्भधारणा नैसर्गिक असल्याकारणाने) त्यांच्यावर मातृत्व लादले जाते,' असे मत मांडणा-या लेखिका डोरिस लेसिंग (Doris Lessing) यांना व त्यांच्या साहित्याचा समावेश काही अभ्यासकांनी स्त्रीवादी साहित्यशाखेत केलेला दिसतो. पण त्या मात्र स्वतःला स्त्रीवादी समजत नाहीत आणि त्यांना स्त्रीवादी म्हटलेले आवडतही नाही. स्त्रीवादी न म्हणवून घेणा-या डोरिस यांनी काही वर्षे साम्यवादाला जवळ केले होते. साहित्यक्षेत्रात त्यांचा प्रवेश १९५०मध्ये झाला. या नंतर सुमारे ५७ वर्षांनी, वयाच्या ८७व्या वर्षी त्यांना नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले (२००७). ब्रिटननिवासी असलेल्या डोरिस लेसिंग यांचा जन्म तत्कालीन पर्शियात (आता इराण) २२ ऑक्टोबर १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील - आल्फ्रेड टेलर - हे लष्करात होते. पहिल्या महायुद्धात जखमी झाल्यानंतर ते रु ग्णालयात दाखल झाले होते. या काळात त्यांची सेवा करणा-या परिचारिकेबरोबर त्यांनी विवाह केला. तत्कालीन पर्शियात एका बँकेत टेलर यांना नोकरी मिळाली होती. त्यामुळे डोरिस यांचे बालपण पर्शियात गेले. तेथून त्यांच्या आईवडिलांनी आफ्रिकेत (झिंबाब्वे) स्थलांतर केल्याने त्यांचे शिक्षण आफ्रिकेत झाले. या पार्श्वभूमीमुळे डोरिस यांची एक ओळख आफ्रिकी लेखक अशीही आहे. आफ्रिकेत असताना डोरिस लेसिंग यांना शालेय शिक्षणासाठी घरापासून दूर जावे लागले होते. पण घरापासून लांब राहणे त्यांना मानवले नाही. वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांनी शालेय शिक्षण सोडले व नोकरी पत्करली.



काही काळ नोकरी केल्यानंतर १९ व्या वर्षी त्यांनी फ्रँक विसडॉम यांच्याशी विवाह केला. त्यांना दोन मुले झाली. हे विवाहबंधन १९४३मध्ये संपुष्टात आले. याच वर्षी त्यांनी साम्यवादी चळवळीशी संबंधित असलेले गॉटफ्राइड लेसिंग यांच्याशी विवाह केला. आफ्रिकेतील या काळात त्या साम्यवादी चळवळीकडे आकर्षित झाल्या होत्या. डोरिस लेसिंग यांचा दुसरा विवाह पण टिकला नाही. दरम्यान, पहिल्या लग्नापासून झालेली दोन मुले त्यांच्या वडिलांकडे विसडॉम यांच्याकडे राहिली आणि आपल्या सर्वांत धाकट्या मुलाला घेऊ न डोरिस यांनी १९४९मध्ये आफ्रिकेतून ब्रिटनमध्ये स्थलांतर केले. तत्पूर्वी, कौटुंबिक आघाडीवर अस्थैर्य असतानाही १९४९ मध्ये त्यांनी The Grass is Singing ही पहिलीच कादंबरी लिहिली होती. ब्रिटनमध्ये आल्यानंतर ती कादंबरी प्रसिद्ध झाली. आफ्रिकेतील गौरवर्णीय महिला शेतकरी आणि तिचा अशक्त व आजारी नवरा यांची ही कहाणी होती. एका आफ्रिकी नोकराबरोबर या गौरवर्णीय महिलेचे विवाहबाह्य संबंध असतात. हा आफ्रिकी नोकर गौरवर्णीय महिलेची हत्या करतो अशी ही कथा होती. ब्रिटनमध्ये आल्यानंतर त्यांनी लेखनावरच उदरनिर्वाह केला. ब्रिटनमध्येही त्या काही काळ साम्यवादी पक्षाशी संबंधित होत्या. पण नंतर लवकरच त्यांनी साम्यवादाची कास सोडली.

या काळात त्यांचा परिचय इद्रिस शाह या सूफीपंथीय व्यक्तीशी झाला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली डोरिस यांनी सूफीपंथांचा अभ्यास केला. तसेच एक लाख डॉलरचा निधी जमा करू न १९७९ मध्ये एक सूफी विश्वस्त संस्थाही स्थापन केली होती. या दरम्यान त्यांचे लेखन चालू होतेच. कादंब-या, कथासंग्रह, कविता, नाटके यांबरोबर त्यांनी विज्ञानकथाही लिहिल्या. Martha Quest, A Proper Marriage, A Ripple from the Storm, Landlocked, The Four-Gated City ही त्यांची काही पुस्तके १९५२ ते १९६९ या काळात प्रसिद्ध झाली. या शिवाय Five Short Novels, The Habit of Loving, A man and Two Women, African Stories, The Blank Madonna, The Story of a Non-Marrying Man, This Was the Old Chief's Country हे त्यांचे कथासंग्रहही या काळात प्रसिद्ध झाले.

The Grass is Singing, Retreat to Innocence, The Golden Notebook, The Summer Before the Dark, Memoirs of a Survivor या त्यांच्या कादंब-या १९५६ ते १९७४ या काळात प्रसिद्ध झाल्या. यांपैकी The Golden Notebook या त्यांच्या कादंबरीचा अनेक भाषांत अनुवाद झाला. हे पुस्तक स्त्रीवादी चळवळीसाठी महत्त्वाचे ठरले, असे काही अभ्यासकांना वाटते. यात ॲना वुल्फ या लेखिकेची कथा होती. कादंबरीची नायिका असलेली ही लेखिका 'फ्री विमेन' नावाची एक कादंबरी लिहित असते. या कामासाठी ॲना वुल्फने चार वेगवेगळ्या रंगांच्या 'नोटबुक्स' केलेल्या असतात. पिवळ्या नोटबुकमध्ये चित्रण असते ते ॲनाच्या बहिश्चर प्राणाचे (alter ego). लाल नोटबुक ही असते तिची राजकीय वही तर निळा रंग असतो तिच्या दैनंदिनीचा. आणि ॲनाची पार्श्वभूमी सांगणारी नोटबुक असते काळ्या रंगाची. ग्रंथाच्या शेवटी ॲना आपल्या अमेरिकी प्रियकराला 'गोल्डन नोटबुक' देते. 'फ्री विमेन'मधून ॲना असे मान्य करते की, आपल्याच नोटबुक्समधून पुढे आलेले आपल्याबद्दलचे निखळ सत्य ती स्वतःच मान्य करू शकत नाही.

ही कादंबरी स्त्रीवादी असल्याचे मत काही अभ्यासकांनी मांडले असले तरी स्वतः डोरिस लेसिंग यांना मात्र तसे वाटत नाही. त्यांच्या मते या कादंबरीचा 'फॉर्म' नीट समजून घेतला गेला नाही. या कादंबरीत मानसिक संतुलन ढासळण्याची 'थीम' होती. पण ही 'थीम' म्हणजे जणू एक 'साधन' होते. साधन कशासाठी? तर आपल्याच मनाला भ्रमापासून मुक्ती देण्यासाठी व स्वतःकडे वस्तुनिष्ठपणे पाहण्यासाठी. समाजाकडून वा रूढीपरंपरेमधून स्त्रीवर लादल्या गेलेल्या अनेक (भ्रामक?) समजूतींपासून स्त्रियांनी स्वतःला मुक्त करावे व स्वतःकडे वस्तुनिष्ठपणे - एक व्यक्ती म्हणून पाहावे असा संदेश स्त्रीवादी चळवळीने यातून घेतला असेल का, असा प्रश्न येथे पडतो. लेसिंग यांना स्त्रीवादी म्हटलेले आवडत नाही कारण स्त्रीवादी गट पुरुषांबद्दल सहजपणे जी विधाने करतात वा काही बाबींसाठी त्यांना दोषी धरतात ते डोरिस यांना योग्य वाटत नाही. शिवाय, डोरिस यांचे सूफीपंथाला धरून असलेले विचार स्त्रीवाद्यांना सोयीचे नसतात तेव्हा त्यांच्याकडून त्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण केले जाते.



स्त्रियांनी स्वतःकडे वस्तुनिष्ठपणे पाहावे, असे डोरिस लेसिंग यांना वाटत असल्याची एक घटना येथे नमूद करण्यासारखी आहे. एका मुलाखतीत युद्धखोरी ही पुरुषांचीच मक्तेदारी आहे का, असा प्रश्न डोरिस लेसिंग यांना विचारण्यात आला होता, तेव्हा 'प्रधानमंत्रीपदी असलेल्या स्त्रिया शांततेचीच भूमिका पुढे रेटतात असेही नाही,' असे उत्तर त्यांनी दिले होते. शिवाय, 'अनेक प्रकारच्या गुन्हेगारीत वा अन्य वाईट कृत्ये करण्यात स्त्रियांचाही सहभाग असतो,' अशी पुस्ती त्यांनी जोडली होती. म्हणजे स्त्रियाही अनेकदा चुकीच्या मार्गाला जातात/जाऊ शकतात, असेच या उत्तरातून डोरिस लेसिंग यांना सुचवायचे असावे असे दिसते.

डोरिस लेसिंग यांचे साहित्य साधारणपणे तीन टप्प्यांमधून पुढे आले, असे म्हटले जाते. १९४४ ते १९५६ या काळात साम्यवादी विचारसरणीवर भर, १९५६ ते १९६९ या काळात मानसशास्त्रीय दृष्टिकोणावर भर आणि त्या नंतर सूफीपंथीय विचारसरणीवर भर हे ते तीन टप्पे होत. त्यांनी लिहिलेल्या विज्ञानकथा तिस-या टप्प्यात मोडतात. १९७४ साली प्रसिद्ध झालेल्या Memoirs of a Survivor या ग्रंथात लेसिंग यांनी समाजातील अस्थैर्य व समाजव्यवस्था कोसळण्याच्या स्थितीबाबतचे चित्र उभे केले आहे. हा ग्रंथ काही प्रमाणात लेखिकेचे आत्मचरित्रही पुढे आणतो. लेसिंग यांच्या मते त्यांचे सर्वांत महत्त्वपूर्ण पुस्तक - Canopus in Argos हे आहे. प्रगत समाजाकडून जबरदस्तीने घडवून आणलेल्या उत्क्रांतीसंदर्भातील प्रयत्नांचा आढावा किती वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून घेता येऊ शकतो, ते या पुस्तकातून मांडण्यात आले आहे.

डोरिस लेसिंग अनेक बाबींचा विचार अतिशय वस्तुनिष्ठपणे व कठोरतेने करतात. तीन मुलांची आई बनलेल्या लेसिंग यांना आपण आई बनण्यासाठी मानसिकदृष्ट्या पात्र ठरत नाही, असे वाटते. मुलांमध्ये वेळ घालविणे हे बुद्धिमान स्त्रियांसाठी कंटाळवाणे असू शकते, अशी पुस्ती त्या जोडतात. तसेच जसजसे तुमचे वय वाढते तसतसे तुम्ही ज्ञानी बनता असे नाही तर तुम्ही (समोरच्या व्यक्तीसाठी) त्रासदायक बनता, असे वयाच्या ८८व्या वर्षी त्या बोलून दाखवतात. इतरांच्या विचारांपेक्षा स्वतःच्या विचारांना महत्त्व देणा-या लेसिंग या अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या आहेत. ■■

# जुलुमी राजवटीचा निषेध


हेर्था म्यूलर (१९५३-)

तत्कालीन सोव्हिएत रशियाचा भाग असलेला रु मानिया हा एक छोटासा देश. दुस-या महायुद्धाच्या काळानंतर असलेल्या एकतंत्री राज्यप्रणालीमुळे एकप्रकारच्या बंधनात असलेले नागरी जीवन तेथील नागरिकांच्या अंगवळणी पडले होते तरी त्याबद्दलची अस्वस्थता समाजात होतीच. अशा समाजात वाढलेल्या हेर्था म्यूलर (Herta Muller) यांच्या लिखाणात ही अस्वस्थता व्यक्त झाली आहे. साहित्याचा नोबेल पुरस्कार त्यांना २००९मध्ये मिळाला. काव्यात्म भाषेत व रु पकांच्या मदतीने त्यांचे लेखन सजले आहे.

दुस-या महायुद्धाच्या काळात रुमानियावर जर्मनीने आपले नियंत्रण प्रस्थापित केले होते. महायुद्ध संपल्यानंतर हेर्था यांच्या वडिलांनी ट्रक चालविण्यावे काम केले. हेर्था यांचे सर्व शिक्षण प्रामुख्याने रु मानियातच झाले. तेथील विद्यापीठांमध्ये त्यांनी जर्मन व रुमानियन भाषेचे अध्ययन केले. तेव्हा जर्मन भाषेत लेखन करणा-या गटात त्या सहभागी झाल्या होत्या. या काळात त्यांचा परिचय रिचर्ड वागनेर यांच्याशी झाला. पुढे त्या दोघांनी विवाह केला. रिचर्ड वागनर हे साम्यवादी पक्षाचे सदस्य होते. या पतिपत्नींच्या जीवनात विलक्षण साधर्म्य आढळते. या दोघांचेही मातापिता Banat Swabian या वांशिक गटाचे होते. जर्मन व रुमानिया या भाषांच्या अध्ययनात या पतिपत्नींना रस होता. दोघेही एकाच विद्यापीठात होते. लेखन हा दोघांच्याही आवडीचा प्रांत असल्याने अभिव्यक्तीस्वातंत्र्य मानणा-या लेखकांच्या गटात दोघांचाही सहभाग होता. हे दोघेही निबंधकार व कादंबरीकार आहेत. जर्मन भाषेत दोघांचीही पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. १९८७पासून ते जर्मनीत स्थायिक झाले आहेत.



अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर मर्यादा आणणारे रुमानियातील दबावग्रस्त वातावरण हेर्था म्यूलर यांना मान्य नव्हते. पण १९८७पर्यंत त्यांना देश सोडून जाण्याची परवानगी मिळाली नाही. त्याला कारण म्हणजे तरु ण वयात नोकरी करीत असताना त्यांनी सरकारच्या दबावाला बळी पडण्याचे नाकारले होते. त्या एका कंपनीत भाषांतरकार म्हणून नोकरी करीत होत्या तेव्हा त्यांच्याकडून विशिष्ट माहिती गुप्तपणे मिळविण्यासाठी तत्कालीन सरकारने त्यांच्यावर दबाव आणला होता. पण त्यांनी असे सहकार्य करण्याचे नाकारले व नोकरी सोडली. त्यानंतर त्यांनी लहान मुलांच्या शाळेत शिक्षिकेची नोकरी केली. तसेच खाजगी शिकवण्या घेतल्या.

हेर्था यांचे बालपण रुमानियातील ज्या समाजात गेले तेथे जुन्या काळातील मूल्ये व परंपरा यांचा प्रभाव होता. स्त्री-पुरु षांच्या संदर्भातील परंपरागत भूमिकांचे पालन केले जात होते. सुरुवातीच्या काही कादंब-यांमध्ये या समाजाचे शब्दचित्र आढळते. रुमानियातील जर्मन नागरिक अल्पसंख्याक गटात मोडतात. Niederungen ही जर्मन भाषेतील १९८२साली प्रसिद्ध झालेली त्यांची पहिलीच कादंबरी होय. रुमानियातील तत्कालीन सरकारने त्यातील काही मजकूर कापून मगच ती प्रसिद्ध करण्यास परवानगी दिली होती. रुमानियातील Banat Swabian या वंशाचे नागरिक बहुसंख्य असलेले एक खेडे नामशेष होण्याच्या दिशेने कसे जाते आहे, त्याचे चित्र जर्मन भाषेत लिहिलेल्या या कादंबरीत, एका लहान मुलाच्या दृष्टिकोणातून मांडण्यात आले आहे. या कादंबरीत जर्मन समाज-संस्कृतीच्या संदर्भात त्यांनी बेडकाचे रूपक वापरले आहे. जर्मन भाषेतील Druckender Tango ही त्यांची दुसरी कादंबरी १९८४मध्ये प्रकाशित झाली. रु मानियातील जर्मन भाषिक खेड्यातील ही कथा भ्रष्टाचाराबरोबरच समाजातील असहिष्णूता आणि दबावतंत्र या बाबीही वाचकांपुढे आणते. रुमानियाच्या सरकारने या दोन्ही कादंब-यांवर टीका केली तरी जर्मनीने मात्र या दोन्ही कादंब-यांचे स्वागतच केले. कारण, या कादंब-यांतून लेखिकेने रुमानियातील हुकुमशाही कारभारावर ताशेरे ओढले होते. १९८४ ते १९९४ या दहा वर्षांच्या काळात, जर्मन भाषेतील त्यांच्या १० कादंब-या प्रसिद्ध झाल्या. त्यांतील काही कादंब-यांचे अनुवाद अन्य भाषांमध्ये प्रसिद्ध झाले.

Travelling on One Leg या १९८९साली प्रसिद्ध झालेल्या कादंबरीने रुमानियन-जर्मन स्थलांतरित व्यक्तीची कहाणी पुढे आणली होती. या स्थलांतरित व्यक्तीचे अन्य तीन व्यक्तींबरोबर अतिशय निकटचे संबंध प्रस्थापित झालेले असतात. व्यक्तींचे परस्परांत गुंफलेले राजकीय आणि खाजगी जीवन, काही प्रसंगी होणारी मनाची भावविभोर अवस्था अशा अनेक बारकाव्यांचे वर्णन या कादंबरीत केले आहे. यात रुमानियाचा थेट उल्लेख करण्याचे लेखिकेने टाळले आहे. तसेच, काही प्रसंग लेखिकेच्या जीवनातील घडामोडींशी संबंधित आहेत असे म्हटले गेले आहे. काव्यात्म भाषा व कथनातील तरलता हे या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणता येईल. हेर्था म्यूलर याचे पती रिचर्ड वागनर यांनीदेखील जर्मन भाषेतील त्यांच्या दोन कादंब-यांमधून अशाच प्रकारचा विषय मांडला होता.

१९९२मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका कादंबरीत हेर्था यांनी १९८०च्या दशकातील रुमानियाचे चित्र वाचकांसमोर आणले आहे. त्यांच्या लेखक गटातील दोन लेखकांचा मृत्यू संशयास्पद परिस्थितीत झाला होता. त्या घटनेच्या आधारे हेर्था यांनी १९९४मध्ये The Land of Green Plums ही कादंबरी लिहिली होती. एकतंत्री राजवटीमुळे दोन व्यक्तींमधील मैत्री कशी संपुष्टात येते हे सांगणारे ते कथानक होते.

१९९७साली प्रकाशित झालेली The Appointment ही कादंबरी एक वेगळे कथानक घेऊन वाचकांपुढे येते. समाजापासून दुरावलेल्या, एकट्या पडलेल्या, एका व्यक्तीचे एकाकी जीवन या कथेतून पुढे येते. ही एकाकी पडलेली व्यक्ती एका कंपनीतील कामगार आहे. ट्राममधून प्रवास करीत असताना त्याने स्वतःला विचारलेल्या प्रश्नांच्या माध्यमातून ही कहाणी पुढे पुढे सरकत जाते. ट्रामच्या प्रवासात जशी अचानक वळणे येतात तशीच वळणे या व्यक्तीच्या जीवनातही येतात. यातील वाक्ये वाचकाला विचार करायला भाग पाडतात, असे समीक्षकांनी नोंदविले आहे. समाजातील अनैतिकता, फसवणूक, जुलूम इत्यादी विषय पुढे आणताना लेखिकेने मानसशास्त्रीय विचारविश्वाचा आधार घेतला आहे. व्यक्तीच्या मनात डोकावून लेखिका जेव्हा भीती, गोंधळ, नैराश्य या भावभावनांचे चित्रण करते तेव्हा वाचक अस्वस्थ होणे हे स्वाभाविक ठरते.



मनोरंजन वा निखळ वाचनानंद हा या कादंबरीचा हेतू नसला तरी ही कादंबरी एका वेगळ्या विश्वाची ओळख करून देते आणि हे सर्वच वाचकांच्या पचनी पडणारे नाही. मात्र, गंभीर विषय आवडणा-या वाचकांना एक वेगळा अनुभव देणारी ही कादंबरी आहे, अशा शब्दांत हेर्था यांच्या या साहित्यकृतीचे स्वागत झाले. हेर्था म्यूलर यांच्या लिखाणाला जगभरातून मान्यता मिळू लागली ती १९९०च्या दशकात. त्यांच्या कादंब-यांचे भाषांतर सुमारे वीस भाषांमधून झाले. जर्मनभाषेतील साहित्यनिर्मितीसाठी असलेले विविध प्रकारचे २०हून अधिक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. त्यात Kleist Prize (१९९४), Aristerion Prize (१९९५), International IMPAC Dublin Literary Award (१९९८), आणि Franz Werfel Human Rights Award (२००९) इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे.

एखाद्या देशात वंश वा विविध समाजगट या दृष्टिकोणातून सामान्य नागरिकांवर अन्याय-अत्याचार होतात तेव्हा सामान्य माणसांनाच आपल्या अस्तित्वासाठी झगडावे लागते. आपली स्वतःची ओळख तेथे निर्माण करावी लागते. ही ओळख अन्याय करणा-यांच्या विरोधात असते मात्र त्याचवेळी ती राष्ट्रविघातक नसते. पण मानवी हक्कांचा पुरस्कार करणारी असते. हेर्था म्यूलर यांनी आपल्या साहित्यातून काहीशी अशा प्रकारची सामान्य माणसांची लढाई पुढे आणली, असे समीक्षकांनी म्हटले आहे. तत्कालीन सोव्हिएत युनियनच्या विघटनापूर्वी रुमानियात होती तशाच प्रकारची परिस्थिती पूर्व युरोपीय देशांमध्ये साधारणपणे होती. त्यामुळे, रुमानियातील परिस्थिती पुढे आणणा-या हेर्था म्यूलर यांच्या जर्मन भाषेतील साहित्याचा अन्य भाषांमध्येही अनुवाद झाला आणि तो वाचकांच्या पसंतीसही उतरला.

हेर्था म्यूलर यांच्या कादंबरीत समाजजीवन जसे चित्रित होते त्याप्रमाणेच स्त्री जीवनही शब्दबद्ध होते. पण आपण स्त्रीवादी लेखिका नाही, असे हेर्था स्पष्ट करतात. त्यांच्या मते त्या व्यक्तिवादी आहेत. विसाव्या शतकातील जगाच्या एका कोप-यातील अस्वस्थता आणि राजकीय स्थित्यंतरे अनुभवणा-या हेर्था यांच्या साहित्याने पूर्व युरोपीय देशांमधील वाचकांना गंभीर वाचनखाद्य उपलब्ध करून दिले आहे. ■■

### प्रमुख संदर्भ

(**A)Websites:**(1)http://www.kirjasto.sci.fi (2)http://en.wikipedia.org (3) www.queertheory.com/histories (4)http://nobelprize.org/nobel_prizes/literature/laureates (5)http://www.nndb.com/people/583/00140163 (6) www.ultimateltaly.com/peoples (7) http://muse.jhu.edu/jourlals/italian_culture/v023/23.1hryer-caput.html (8)http:// www.catholiceducation.org/articles/arts/al0008.html (9)http://merecomments.typepad.com (10) www.brucebawer.com (11)www.english.upenn.edu/Projects/buck/biography.html (12) http://www.gradesaver.com (12) gosouthamerica.about.com (13) http://www.oppapers.com(14)http://www.novelguide.com(15)www.literature-prize.com (15)http://www.theverylongview.com (16)www.nelly-sachs.com (17)www.theindian.com (18)www.arlindo-correia.com (19) www.nybooks.com (20) www.time.com (21)http://www.bordeaux.diplo.de ■■


## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक अॅन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.




**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे आद्य प्रकाशन**
**आता पुनर्मुद्रित स्वरूपात**

**भारतातील गरिबीच्या समस्येचे स्वरूप तिच्या कारणांसह तपशीलवार उलगडून दाखविणारा दस्तऐवज**

# Poverty in India

**लेखक**

वि.म. दांडेकर    नीळकंठ रथ

पृष्ठे १४०    किंमत : २००/- रुपये

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा विविध स्तरांतील वाचकांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी    फक्त १०० / - रुपये**

**द्वैवार्षिक वर्गणी    फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट**

**त्रैवार्षिक वर्गणी    फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट**

**पंचवार्षिक वर्गणी    फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट**

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)